पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १८२ ■ गुरूवार, दि. ८ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा




# 'हिंदुत्वाची प्रतिमा मलीन'

## भाजप-एमआयएम युती करण्यास विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचा कडाडून विरोध.....

राजेश सोळंके ८ जानेवारी

**अकोटः** भाजपने एमआयएमसोबत केलेल्या युतीविरोधात विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र आक्षेप नोंदवला असून, हा निर्णय हिंदुत्वाला बदनाम करणारा असल्याचा आरोप करण्यात आला आहे. हिंदुत्वाच्या मुद्द्यावर जनतेकडे जाऊन मते मागणाऱ्या भाजपनेच एमआयएमसारख्या पक्षाशी युती करणे म्हणजे कार्यकर्त्यांची व मतदारांची फसवणूक असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. या घडामोडीनंतर भाजप प्रदेशाध्यक्षांनी

आमदार प्रकाश भारसाकळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असली, तरी ही कारवाई केवळ 'जनतेसमोर केलेली नौटंकी' असल्याची चर्चा भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये सुरू आहे.

प्रत्यक्षात युती घडवून आणणाऱ्यांवर ठोस कारवाई होत नसल्याने नाराजी वाढत आहे. या प्रकरणामुळे अकोटच्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू असून भाजपची पुढील भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तर अकोट शहर कार्यकारणी बरखास्त होण्याचे संकेत असून आघाडीचे खुळ ज्याने कोणी समोर आणले त्यावर मात्र कडक कारवाईचा इशारा मुख्यमंत्र्यांसह प्रदेशाध्यक्षांनी दिला आहे.

विश्व हिंदू परिषद अकोट तालुक्याचे अध्यक्ष विजयजी चंदन यांनी सांगितले, 'आम्ही नेहमी हिंदुत्व हा मुद्दा केंद्रस्थानी ठेवून काम करतो. हिंदुत्वामुळेच भाजपला मोठे यश मिळाले. अशा परिस्थितीत भाजपने एमआयएमसोबत युती केल्यास आम्ही जनतेसमोर हिंदुत्व घेऊन कसे जायचे? म्हणूनच आम्ही या युतीवर स्पष्ट हरकत नोंदवली आहे. बजरंग दल अकोटचे संयोजक विजयजी कुलट यांनीही भाजपच्या निर्णयावर तीव्र शब्दांत टीका केली. 'भाजपने एमआयएमसोबत युती करून अतिशय चुकीचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय केवळ सत्तेच्या स्वार्थापोटी घेतलेला आहे. अकोट विकास मंचमध्ये शिवसेना शिंदे गट, शिवसेना उद्धव ठाकरे गट, प्रहार, राष्ट्रवादी अजित पवार गट, राष्ट्रवादी शरद पवार गट यांचा समावेश असण्यास आमचा आक्षेप नाही; मात्र कट्टर धार्मिक विरोध करणाऱ्या एमआयएमला सोबत घेण्याची गरज काय होती? युतीवर स्थगिती आली असली, तरी ज्यांनी ही युती घडवून आणली त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे,' अशी मागणी त्यांनी केली.

### अकोट शहर कार्यकारणी बरखास्त होण्याचे चिन्ह !

विश्व हिंदू परिषद अकोट प्रखंड मंत्री मनीष इटणारे यांनी भाजपकडून देण्यात आलेल्या स्पष्टीकरणाची माहिती दिली. 'भाजपने नेहमी हिंदुत्वाचा मुद्दा पुढे करून निवडणुका लढवल्या आणि यश मिळवले. एमआयएमशी थेट युती नसून 'अकोट विकास मंच'च्या नावाखाली अनेक पक्षांनी पाठिंबा दिला असल्याचे भाजपकडून सांगण्यात आले आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले.

विश्व हिंदू परिषद शहराध्यक्ष डॉ. दिनेश नागमते यांनीही नाराजी व्यक्त करत सांगितले, 'आम्ही हिंदुत्वाचा प्रचार व प्रसार करतो. त्यामुळे हिंदुत्ववादी उमेदवारांचा प्रचार केला आणि ते निवडूनही आले. मात्र अकोट नगर परिषदेतील सध्याच्या राजकीय घडामोडींमुळे मन व्यथित झाले आहे. कट्टरवादी एमआयएमचा आम्ही शेवटपर्यंत विरोध करू आणि अकोटमध्ये झालेल्या या तथाकथित अभद्र युतीचा तीव्र निषेध करतो.

# अकोला महानगरपालिकेच्या आखाड्यात नवखे विरूद्ध दिग्गज सामना !

प्रतिनिधी ८ जानेवारी

**अकोला :** अकोला महानगरपालिकेची निवडणूक यंदा अनेक कारणांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरत आहे. अनेक या निवडणुकीत अनेक दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे तर नवखे युवकांना दिग्गजांचे खडतर आव्हान पेलावे लागणार आहे. त्यामुळे ही लढत सरळ दिग्गज विरूद्ध नवखे अशीच रंगणार असल्याचे चित्र सध्या तरी दिसत आहेत. यात मतदार कोणाला पसंती देतील हा येणार काळच ठरवणार आहे. या निवडणुकीत दिग्गजांचा अनुभव कामात येतो की तरूणांचा उत्साह हे पाहणेही रंजक ठरणार आहे.

महापालिकेचा प्रचार जोरात सुरू असून, सर्वांनी आपली संपूर्ण ताकद प्रचारासाठी लावली आहे. प्रत्येक पक्षाचे उमेदवार व अपक्ष उमेदवार आपला वॉर्ड, प्रभाग पिंजून काढत आहेत. प्रत्येक मतदारांपर्यंत पोहोचण्याा प्रयत्न उमेदवार आटोकाटपणे करीत आहेत. असे असले तरी खरी लढत ही नवेख विरूद्ध अनुभवी अशीच रंगाणार आहे. कारण या निवडणुकीत तीन माजी महापौराच्या कुटुंबीयातील सदस्य, चारी माजी उपमहापौर, तीन माजी स्थायी समिती सदस्य एक विरोधी पक्षनेता यासह ६४ नगरसेवक पुन्हा निवडणूक रिंगणात उतरले आहेत. तर दुसरीकडे युवकांची संख्याही लक्षणीय अशीच आहे. या युवकांकडे अनुभव कमी असला तरी त्यांच्यामध्ये ऊर्जा ठासून भरलेली असल्यामुळे व आतापर्यंत केलेल्या कामाच्या जोरावर ते महानगरपालिकेच्या आखाड्यात नशीब आजमावण्यासाठी सज्ज झाले आहेत. त्यामुळे ही निवडणूक सर्वार्थाने रंजक व चुरशीची ठरणार आहे, एवढे मात्र निश्चित.

### या दिग्गजांसाठी ठरणार ही प्रतिष्ठेची लढाई

माजी महापौर विजय अग्रवाल हे भाजपच्या तिकिटावर सलग सहाव्यांदा निवडणूक लढवत असून, त्यांच्या अर्धांगिनी सुनीता अग्रवाल या दुसऱ्यांदा रिंगणात आहेत. काँग्रेसचे माजी महापौर मदन भरगड यांच्या पत्नी संगीता भरगड या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या उमेदवार आहेत. भाजपच्या माजी महापौर अर्चना मसने यांचे पती जयंत मसने हे भाजपकडून निवडणूक लढवत आहेत. काँग्रेसचे माजी महापौर सुरेश पाटील यांचे चिरंजीव चेतन पाटील हे शिंदे गटाच्या शिवसेनेतर्फे रिंगणात उतरले आहेत. भाजपच्या माजी महापौर वैशाली शेळके ह्या दुसऱ्यादा उमेदवार असून सभापती बाळ टाले हे चवथ्यांदा, संजय बडोणे हे सहाव्यांदा व विशाल इंगळे हे दुसऱ्यांदा भाजपकडून निवडणूक लढवत आहेत.

### युवकांचा राहणार खडतर मार्ग

एकीकडे सत्तेचा अनुभव, पकड आणि विकासकामांचा प्रशासनातील दीर्घ अनुभव असलेले दिग्गज तर दुसरीकडे सर्वच बाबतीत नवखे असलेले युवक अशी ही लढत जिंकण्याचा मार्ग तरूणांसाठी खडतर असणार आहे. ते हा मार्ग कसा पार करतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### दिग्गजही आमने -सामने

महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १६-ड मध्ये स्थायी समितीच्या दोन माजी सभापतींमध्ये थेट लढत होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षातर्फे माजी उपमहापौर व माजी स्थायी समिती सभापती मो. रफिक सिद्दीकी, तर भाजपकडून माजी विरोधी पक्षनेते व माजी स्थायी समिती सभापती संजय बडोणे आमने-सामने आहेत.

# चौथी, सातवीची १५ एप्रिलपूर्वी अंतिम सत्र परीक्षा

प्रतिनिधी ८ जानेवारी

**पुणे :** इयत्ता चौथी व सातवी आणि इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांची २२ फेब्रुवारी रोजी आणि चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा २६ एप्रिल रोजी होणार आहे. मागील वर्षीपासून शैक्षणिक वर्षातील अंतिम सत्र परीक्षा एप्रिलच्या तिसऱ्या व चौथ्या आठवड्यात घेतली जात आहे. पण, शिष्यवृत्ती परीक्षेमुळे चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांची अंतिम सत्र परीक्षा १५ एप्रिलपूर्वीच पार पडणार आहे. शिष्यवृत्ती परीक्षेसाठी दोन पेपर असतात. पहिल्या पेपरमध्ये प्रथम भाषा व गणित आणि दुसऱ्या पेपरमध्ये तृतीय भाषा आणि बुद्धिमत्ता चाचणी असते. दोन्ही पेपर प्रत्येकी १५० गुणांचे असतील. बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न असतात. ही परीक्षा मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी, गुजराती, तेलगू व कन्नड या माध्यमातून होतील. परीक्षेत मेरिटमध्ये आलेल्या चौथीतील विद्यार्थ्यांना तीन वर्षे दरवर्षी पाच हजार रुपये आणि सातवीच्या विद्यार्थ्यांना तीन वर्षे साडेसात हजार रुपयांची शिष्यवृत्ती शासनाकडून दिली जाते.

# पाच हजारापेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या बांधकामाबाबत राज्य सरकारचा मोठा निर्णय!

प्रतिनिधी ८ जानेवारी

**मुंबई :** राज्यातील बांधकाम क्षेत्रासाठी दिलासादायक ठरणारा महत्त्वाचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यापुढे पूर्ण झालेल्या एखाद्या बांधकाम प्रकल्पात आठ सदनिका किंवा पाच हजार चौरस फुटांपर्यंतचे बांधकाम असल्यास त्यावर केवळ ' मोफा ' (महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट ॲक्ट ) कायदाच लागू राहणार आहे. तर पाच हजार चौरस फुटांपेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या बांधकाम प्रकल्पांसाठी एकमेव 'महारेरा' (महाराष्ट्र रिअल इस्टेट रेग्युलेटरीॲक्ट) कायदा लागू असेल. राज्य सरकारने आश्वासनानुसार हा बदल करण्यात आला असून, याचा थेट फायदा घरखरेदीदारांबरोबरच बांधकाम व्यावसायिकांनाही होणार आहे.

# CCI ने कापूस नोंदणीला दिली मुदतवाढ !

प्रतिनिधी ८ जानेवारी

**अकोला :** कापूस खरेदीसाठी आवश्यक असलेली ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया ३१ डिसेंबर २०२५ रोजी बंद होणार होती. मात्र, आता ही नोंदणी प्रक्रिया १६ जानेवारी २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

भारतीय कापूस महामंडळाने म्हणजेच सीसीआयने ही माहिती मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाला दिली आहे. या निर्णयामुळे राज्यातील हजारो कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यापूर्वी भारतीय कापूस महामंडळाने अधिकृत कापूस खरेदी केंद्रांवरील नोंदणी प्रक्रिया ३१ डिसेंबरला बंद करण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय शेतकऱ्यांच्या हिताविरुद्ध असल्याचा आरोप करत जनहित याचिकाकर्ते श्रीराम सातपुते यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेच्या सुनावणीदरम्यान न्यायालय मित्र ॲड. पुरुषोत्तम पाटील यांनी शेतकऱ्यांची बाजू मांडली. सुटीकालीन न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या समोर या प्रकरणाची सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान ॲड. पाटील यांनी सांगितले की, विदर्भासह राज्यातील अनेक भागांत कापूस उत्पादन एकाच वेळी होत नाही.

# विदर्भात थंडीचा जोर आणखी वाढणार !



प्रतिनिधी ८ जानेवारी

**नागपूर :** राज्यात गेल्या काही दिवसांपासून हवामानात मोठे बदल पाहायला मिळत आहेत. ढगाळ वातावरण आणि काही ठिकाणी झालेल्या पावसानंतर आता थंडीचा जोर अचानक वाढला आहे. विशेषतः विदर्भ भागात किमान तापमानात मोठी घट झाल्याने थंडीची लाट आल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे.

अनेक ठिकाणी पहाटेच्या वेळी तीव्र गारठा जाणवत असून नागरिकांना उबदार कपड्यांचा आधार घ्यावा लागत आहे.

### हवामान विभागाने काय दिली माहिती?

हवामान विभागाच्या माहितीनुसार, विदर्भात किमान तापमान ७ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले आहे. गोंदिया येथे राज्यातील सर्वात कमी म्हणजेच ७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. नागपूरमध्ये किमान तापमान ७.६ अंश सेल्सिअस, वर्धा येथे ८.४ अंश, तर धुळे येथील कृषी महाविद्यालय परिसरात ८ अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले आहे.

मंगळवारी अमरावती, गोंदिया, नागपूर, वर्धा आणि ब्रह्मपुरी या जिल्ह्यांमध्ये थंडीची लाट नोंदवण्यात आली होती. राज्यातील इतर भागांचाही विचार केला, तर अनेक ठिकाणी गारठा वाढलेला दिसून आला. काही भागांत सकाळच्या वेळी दाट धुके पडले होते, तर काही ठिकाणी दवबिंदूंचे प्रमाण वाढलेले होते. यामुळे रस्त्यांवर वाहतूक करताना अडचणी निर्माण होत असून वाहनचालकांनी काळजी घेणे आवश्यक आहे.

अमरावती, ब्रह्मपुरी, परभणी आणि भंडारा येथेही तापमान १० अंशांपेक्षा कमी राहिले आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, जेव्हा किमान तापमान १० अंशांच्या खाली जाते आणि सरासरीपेक्षा ४.५ अंशांनी घट होते, तेव्हा त्या स्थितीला थंडीची लाट म्हटले जाते. जर ही घट ६.५ अंशांपेक्षा अधिक असेल, तर ती तीव्र थंडीची लाट मानली जाते.

# काँग्रेसचे सर्व निलंबित १२ नगरसेवक भाजपमध्ये सामील

प्रतिनिधी ८ जानेवारी

**मुंबई :** महाराष्ट्रातील अंबरनाथ नगर परिषद निडणूक फक्त राज्यात नाही तर देशात राजकीय चर्चेचा विषय ठरली होती. इथं सत्तेसाठी भाजप अन् काँग्रेस एकत्र आल्यानं सर्वांनीच तोंडात बोटं घातली होती. त्यानंतर राज्यातील मोठ्या नेत्यांनी या अभद्र युतीला चाप लावण्याचा प्रयत्न केला. मात्र बुधवारी भाजपनं मोठी खेळी करत काँग्रेसच्या निलंबित १२ नगरसेवकांचा पक्षप्रवेशच करून घेतला.

अंबरनाथमध्ये बुधवारी रात्री मोठा राजकीय खेळ झाला असून काँग्रेसचे नुकतेच निवडून आलेले सर्व १२ नगरसेवक हे भाजपमध्ये सामील झाले आहेत. काँग्रेसने निवडणुकीनंतर भाजपशी हातमिळवणी केली म्हणून कारवाई करत यांना निलंबित केलं होतं.

महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगर परिषदेच्या निवडणुकीनंतर काँग्रेसचे सर्व निलंबित नगरसेवक भाजपमध्ये सामील झाले आहेत. बुधवारी रात्री रविंद्र चव्हाण यांनी या काँग्रेसने निलंबित केलेल्या सर्व १२ नगरसेवकांचा भाजपमध्ये प्रवेश करून घेतला. त्यानंतर याची औपचारिक घोषणा देखील करण्यात आली.

काँग्रेस आणि भाजप हे दोन पक्ष परंपरागत आणि वैचारिकदृष्ट्या देखील कट्टर विरोधक आहेत. हे दोन्ही पक्ष एकत्र येतील असं कोणालाही स्वप्नात देखील वाटलं नसेल. मात्र ही 'स्वप्नवत' कामगिरी अंबरनाथ नगरपरिषदेत दोन्ही पक्षांच्या स्थानिक नेत्यांनी करून दाखवली होती.

# २६ वर्षात पहिल्यांदाच रविवारी केंद्रीय अर्थसंकल्प सादर होणार

वृत्तसंस्था ८ जानेवारी

**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत एक महत्त्वाची अपडेट समोर येत आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण १ फेब्रुवारी, रविवार रोजी केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ सादर करणार आहेत.

केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील संसदीय कामकाज समितीने (सीसीपीए) बुधवारी संसदेच्या आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या प्रमुख तारखांना मान्यता दिली आहे. तर न्यूज१८ ने सूत्रांच्या हवाल्याने वृत्त दिले आहे की, संसदीय दिनदर्शिकेनुसार, अर्थमंत्री निर्मला सीतारमण १ फेब्रुवारी, रविवार रोजी केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ सादर करतील. खरंतर अलिकडच्या काळातील हा पहिल्याच केंद्रीय अर्थसंकल्प असेल जो रविवारी सादर केला जाणार आहे. या आधी २८ फेब्रवारी १९९९ रोजी वाजपेयी सरकारच्या काळात अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांनी रविवारी अर्थसंकल्प सादर केला होता.




# अमेरिका तिसऱ्या महायुद्धासाठी सज्ज !

### ५००% कर; रशियासह भारताचेही वाढवले टेन्शन

वृत्तसंस्था ८ जानेवारी

**नवी दिल्ली :** ट्रम्प प्रशासनाने रशियातून आयात होणाऱ्या सर्व वस्तू आणि सेवांवर ५००% पर्यंत आयात शुल्क लादण्याच्या विधेयकाला हिरवा कंदील दिला आहे. रशियाकडून स्वस्त तेल खरेदी करणे सुरूच ठेवल्यास भारत, चीन आणि ब्राझीलसारख्या देशांवर कठोर आर्थिक निर्बंध आणि प्रचंड आयात शुल्क लावले जाईल, अशी स्पष्ट धमकी अमेरिकेने दिली आहे. ट्रम्प यांनी स्वतः कबूल केले आहे की, अमेरिकेने लादलेल्या उच्च करांमुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या त्यांच्यावर नाराज आहेत, मात्र रशियन तेल खरेदी थांबवण्यासाठी हे पाऊल आवश्यक असल्याचे ट्रम्प यांचे म्हणणे आहे. जागतिक राजकारणात सध्या एकामागून एक मोठे धक्के बसत आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाच्या विरोधात आतापर्यंतचे सर्वात कठोर पाऊल उचलले आहे. रशियाची युद्धयंत्रणा कमकुवत करण्यासाठी ट्रम्प यांनी 'सँक्शनिंग रशिया ॲक्ट २०२५' या द्विपक्षीय विधेयकाला मंजुरी दिली आहे.



२
सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
गुरुवार, दि.८ जानेवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# हातभट्टीची दारू पकडली

**अमरावती:** ०८/०१/२०२६ रोजी पोस्टे फ्रेजरपुरा हद्दी मध्ये गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गुप्त माहिती वरून आरोपी दिनेश माणिकराव नेमाडे, वय ४० वर्ष ,रा परिहारपुरा वडाळी अमरावती हा वडाळी बांबु गार्डन कडे जाणाऱ्या रोड लगत जंगल परिसरात हात भट्टी दारू काढताना मिळून आला वरून त्यांच्याकडून हात भट्टी दारू १०० लिटर व मोहमास सडवा २०० लिटर आणि इतर साहित्य जागीच नष्ट केले.असा एकूण ७७,८५० रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यांच्या विरुद्ध पो.स्टे.फ्रेजरपूरा येथे कलम ६५(क)(फ)(ड) म.दा.का.अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

# लाडकी बहिण योजना कधीही बंद पडणार नाही ?

## ◆ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विश्वास, अमरावतीत जाहीर सभेत विरोधकांवर डागली तोफ

प्रतिनिधी ८ जानेवारी




**अमरावती:** माझ्या आईने काटकसर पाहली आहे. माझ्या पत्नीने काटकसर पाहली आहे, राज्यातल्या माझ्या बहिणीने अनेक बहिणीने काटकसर पाहिली आहे. त्यामुळे लाडल्या बहिणींना मदत व्हावी या चांगल्या उद्देशाने लाडली बहीण योजना मी मुख्यमंत्री असताना सुरू केली. आज त्या लाडक्या बहिणीचा लाडका भाऊ म्हणून मला मिळालेला बहुमान हा सर्व पदांपेक्षा मोठा असून ही लाडली बहीण योजना बंद पडावी, यासाठी अनेकांनी खोडा घातला मात्र ते आडवे पडले मतदारांनी खोडा घालणाऱ्याला जोडा दाखवला.

आता कुठलाही मायका लाल आला तरीही, कधीही लाडली बहीण योजना बंद पडू देणार नाही असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर सभेत मतदारांना दिला ते अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पश्चिम विदर्भाच्या दौऱ्यावर असताना अमरावतीतून त्यांनी प्रचाराचा शुभारंभ केला.

राजकमल चौक स्थित असलेल्या नेहरू मैदानावर त्यांनी विरोधकांवर तोफ डागली. पुढे बोलताना शिंदे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते राम मंदिराचे उद्घाटन करण्यात आले. ते देशाचे सक्षम पंतप्रधान असल्याचा गौरव उद्गारही त्यांनी यावेळी केला. आतापर्यंत ज्या-ज्या पक्षाची सत्ता होती. त्या सर्व पक्षाचा आपण अनुभव घेतला आहे. आता शिवसेनेच्या हाती सत्ता देऊन अनुभव घ्या. महानगरपालिकेत विकासाची गंगा आणण्यात येईल. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेवर आरोप करताना ते म्हणाले की जेव्हा शिवसेना काँग्रेसच्या दावणीला बांधल्या गेली त्या विरोधात या भावानेच उठाव करून आज खरी शिवसेना ताकतीने लढा देत आहे. आपला विधानसभेचा स्ट्राईक रेट तसेच लोकसभेचा स्ट्राइक रेट चांगला होता कमी जागा लढलो जास्त जिंकलो. नगरपालिकेच्या निवडणुकीतही ७० नगराध्यक्ष निवडून आले आहे. अमरावती महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेच्या सर्व उमेदवारांना निवडून देण्याची आव्हानही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर सभेत केले आहे. सभेला केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, अनुसूचित जाती आयोगाचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ, माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता, मंत्री संजय राठोड, माजी आमदार कॅप्टन अभिजीत अडसूळ, ज्ञानेश्वर धाने पाटील, प्रीतीताई बंड, गजानन वाकोडे, तसेच पक्षाचे निरीक्षक, सर्व जिल्हाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख, व पदाधिकारी प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थित होते.

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात राष्ट्रीयस्तरीय 'हॅकाथॉन-२६' स्पर्धेचे आयोजन

## ◆ स्पर्धेत मिळणार दोन लाखांचे पारितोषिक : देशभरातून विद्यार्थी होणार सहभागी

प्रतिनिधी ८ जानेवारी

**अमरावती:** पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय अमरावती येथे टेकलॉन्स २०२६ अंतर्गत राष्ट्रीयस्तरीय 'हॅकाथॉन-२६' या राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विदर्भातील सर्वात मोठ्या विद्यार्थी-केंद्रित हॅकाथॉनपैकी एक म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात असून, तंत्रज्ञान आणि उद्योगाभिमुख समस्या सोडविण्यासाठी हे एक प्रभावी राष्ट्रीय व्यासपीठ ठरणार आहे.

'हॅकाथॉन-२६' हा आठ तासांचा कोडिंग मॅरेथॉन असून, यासाठी २ लाखांचे भव्य बक्षीस विद्यार्थ्यांना या स्पर्धेत मिळणार



आहे. यामध्ये विजेत्या संघासाठी १ लाख रुपये बक्षीस आणि पाच समस्या-विषयक प्रत्येकी वीस हजार रुपये बक्षिसे देण्यात येणार आहेत. या स्पर्धे साठी विविध समस्येकरिता तीनशे हुन अधिक संघानी आपले सोल्युशन सादर केले असून ज्यात अंतिम फेरीसाठी निवडलेल्या ५० संघांमध्ये देशभरातील नामांकित विविध अभियांत्रिकी संस्थांमधील २५० हून अधिक विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

'हॅकाथॉन-२६' उद्घाटन पर्सिस्टंट सिस्टिम्सचे व्यवस्थापकीय संचालक श्री. आनंद देशपांडे साहेब यांच्या हस्ते होणार आहे. स्पर्धेत आर्टिफिशिअल इंटेलिजन्स / मशीन लर्निंग इन हेल्थकेअर, जनरेटिव्ह आर्टिफिशिअल इंटेलिजन्स इन सप्लाय चेन, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स फॉर ट्रेनिंग अँड प्लेसमेंट, इंडस्ट्री ५.० आणि ओपन इनोव्हेशन यांसारख्या भविष्योन्मुख समस्या विधानांवर काम केले जाणार आहे. या हॅकाथॉन स्पर्धेची अंतिम फेरी महाविद्यालयाच्या स्वामी विवेकानंद ऑडिटोरिअम मध्ये १९ जानेवारी २०२६ रोजी, सकाळी ८ वाजता सुरु होणार सतत आठ तास विद्यार्थी समस्येसाठी प्रोग्रामिंग करणार आहे.

या स्पर्धे चे आयोजन संस्थेचे संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य डॉ. मोहम्मद जुहैर, डीन स्टुडंट वेल्फेअर डॉ. सनप्रीत कौर नंदा आणि संगणक अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. व्ही. बी. गडीचा यांच्या मार्गदर्शनात प्रा. अखिलेश तायडे व प्रा. ए. डी. चोखाट हे प्राध्यापक समन्वयक असून करमवीर सिंग ओबेरॉय, आयुष चेनानी आणि अथर्व खवाले हे तांत्रिक मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. तसेच विद्यार्थी समन्वयक यशोवर्धन ठाकरे व वैष्णवी सावरकर हे नोंदणी, समन्वय, व्यवस्थापन व प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी पार पाडणार आहेत.

# अमरावती येथे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची जाहीर सभा





प्रतिनिधी ८ जानेवारी

**अमरावती :** भारतीय जनता पार्टीच्या प्रचारार्थ महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या संदर्भात भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांची जाहीर सभा आज सकाळी ११ वाजता दसरा मैदानावर आयोजित करण्यात आलेली आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गृहराज्यमंत्री ना. पंकज भोयर राहतील. प्रमुख उपस्थिती म्हणून खासदार डॉ. अनिलजी बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, आ. डॉ. संजयजी कुटे, माजी पालकमंत्री प्रवीण पोटे, भाजपचे शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, आ. प्रतापदादा अडसड, आ. सुमीत वानखडे, आ. राजेश बकाने आ. राजेश वानखडे, आ. प्रवीण तायडे आ. उमेश यावलकर, आ. केवलरामजी काळे त्यांची प्रामुख्याने उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमाला हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान शहर भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली 'एक दिवस सैनिकासाठी' अभियानाला सुरुवात

प्रतिनिधी ८ जानेवारी

**अमरावती** देशसेवेतून निवृत्त झालेल्या माजी सैनिकांच्या आणि शहीद जवानांच्या कुटुंबियांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी 'एक दिवस सैनिकांसाठी' हे अभिनव अभियान सुरू केले आहे. २३ डिसेंबर २०२५ रोजी ध्वजदिन निधी संकलन कार्यक्रमात दिलेल्या आश्वासनानुसार, दर महिन्याचा पहिला मंगळवार हा माजी सैनिकांसाठी राखीव ठेवण्यात आला असून, त्याअंतर्गत काल ६ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात या अभियानाचे आयोजन करण्यात आले.



या विशेष दिनानिमित्त जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांशी संवाद साधला. यावेळी उपविभागीय अधिकारी (भातकुली) दादासाहेब दराडे, उपविभागीय अधिकारी (दर्यापूर) राजेश्वर हाडे, अमरावतीचे तहसीलदार विजय लोखंडे, तहसीलदार अश्विनी जाधव (नांदगाव खंडेश्वर), तहसीलदार रवींद्र कानझडे (दर्यापूर) आणि जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद पाथरकर प्रामुख्याने उपस्थित होते.

या अभियानादरम्यान माजी सैनिकांच्या जमिनीचे प्रलंबित वाद, शेतीमध्ये जाण्यासाठी रस्त्यांची अडचण आणि माजी सैनिक विश्रामगृहाच्या बांधकामाशी संबंधित तांत्रिक विषयांवर चर्चा करण्यात आली. महसूल अधिकाऱ्यांनी कागदपत्रांची पडताळणी करून अनेक प्रकरणांमध्ये जागीच मार्ग काढला, तर काही जटिल प्रकरणांमध्ये कालमर्यादा निश्चित करून ती सोडवण्याचे निर्देश दिले. या उपक्रमात मोठ्या संख्येने वीर माता, वीर पत्नी आणि माजी सैनिक संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या या पुढाकारामुळे प्रशासकीय दप्तरदिरंगाई दूर होऊन सैनिकांच्या प्रश्नांना न्याय मिळत असल्याबद्दल माजी सैनिक समुदायाने समाधान व्यक्त केले आहे.

# शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला सवलतीच्या प्रस्तावांना वाढीव मुदत

प्रतिनिधी ८ जानेवारी

## ◆ ३१ जानेवारी अंतीम मुदत

**अमरावती :** शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या आणि लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्याध्ययन सवलतीसाठी अतिरिक्त गुण देण्याची कार्यवाही शासन निर्णयानुसार शिक्षण मंडळामार्फत करण्यात येते. इयत्ता दहावीच्या माहे फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे यासंबंधीचे प्रस्ताव माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे सादर करण्यासाठी ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन पुणे राज्यमंडळाचे सचिव दीपक माळी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे. यापूर्वी शासन निर्णयानुसार सदर विषयासंबंधीचे प्रस्ताव विद्यार्थ्यांनी संबंधित माध्यमिक शाळेकडे १५ डिसेंबरपर्यंत व शाळांनी ते प्रस्ताव विभागीय मंडळाकडे १५ जानेवारीपर्यंत सादर करण्याबाबत सूचीत करण्यात आले होते. तथापि, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांनी पत्रान्वये कळविल्यानुसार, शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२५ चा निकाल जानेवारी २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात जाहीर होणार आहे. त्यामुळे शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला विषयक प्रस्ताव वेळेत सादर करणे शक्य नसल्याने, या वर्षापुरती विशेष बाब म्हणून मुदतवाढ देण्यात आली आहे. शाळांनी विभागीय मंडळांकडे प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख शासन निर्णयानुसार १५ जानेवारी होती तसेच सुधारित अंतिम तारीख ही आता ३१ जानेवारी २०२६ राहील. या मुदतवाढीचा लाभ संबंधित पात्र विद्यार्थ्यांना होणार असून, शाळा प्रशासनाने दिलेल्या वाढीव मुदतीत सर्व प्रस्ताव पूर्ण करून विभागीय मंडळाकडे सादर करावेत, असे आवाहन मंडळाव्दारे करण्यात आले आहे.

# समृद्धी महामार्गावर गॅन्ट्री उभारणीसाठी पाच दिवस वाहतुकीत बदल

प्रतिनिधी ८ जानेवारी

**अमरावती :** हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर प्रवास करणाऱ्या वाहनधारकांसाठी महत्त्वाची सूचना देण्यात येत आहे की, अमरावती जिल्ह्यातील महामार्गाच्या पट्ट्यात ९ जानेवारी ते १३ जानेवारी २०२६ या पाच दिवसांच्या कालावधीत वाहतूक तात्पुरती थांबवण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत 'हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम' अंतर्गत गॅन्ट्री उभारण्याचे काम हाती घेण्यात आले असून, हे काम एकूण १० टप्प्यांत पूर्ण केले जाणार आहे. जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे आणि नांदगाव खंडेश्वर तालुक्यातून जाणाऱ्या कि.मी. ९०+५०० ते कि.मी. १५०+३०० या दरम्यान ही गॅन्ट्री उभारली जाणार आहे. या कामाच्या प्रत्येक टप्प्यादरम्यान संबंधित वाहिनीवरील वाहतूक ४५ ते ६० मिनिटांसाठी पूर्णतः बंद ठेवली जाईल. प्रत्येक टप्प्यातील काम पूर्ण झाल्यानंतर त्या वाहिनीवरील वाहतूक पुन्हा पूर्ववत करण्यात येईल. या तांत्रिक कामामुळे प्रवाशांचा काही काळ खोळंबा होण्याची शक्यता असल्याने, प्रवाशांनी आपल्या प्रवासाचे नियोजन वेळेनुसार करावे आणि महामार्गावरील कर्मचाऱ्यांच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# अखेर रतन इंडिया व्यवस्थापन उपोषणकर्त्यांपुढे झुकले !

प्रतिनिधी ८ जानेवारी

**नांदगाव पेठ :** भाजप नेते विवेक गुल्हाने यांनी सहकाऱ्यांसह सुरू केलेल्या आमरण उपोषणामुळे रतन इंडिया ऊर्जा प्रकल्प व्यवस्थापनाला अखेर माघार घ्यावी लागली. दोन दिवसांपासून सुरू असलेल्या या उपोषणाने मंगळवारी निर्णायक वळण घेतले. कामगार व कार्यकर्ते आक्रमक झाल्यानंतर व्यवस्थापनावर दबाव वाढत गेला आणि मंगळवारी सायंकाळी ७३ कामगारांच्या खात्यात तब्बल २८ लाख रुपये ग्रॅज्युइटी व कपात केलेली रक्कम जमा करण्यात आली. दिल्ली मॅनेजमेंट फॅसिलिटी कंपनीने तात्काळ रक्कम अदा केली, तर उर्वरित मागण्यांबाबत रात्री दहा वाजता लेखी रतन इंडिया व्यवस्थापनाच्या वतीने आश्वासन देण्यात आले.

७३ कामगारांच्या खात्यात तात्काळ २८ लाख रुपये जमा
आ. राजेश वानखडे यांच्या पुढाकाराने विवेक गुल्हाने यांचे उपोषण सुटले



या आंदोलनादरम्यान रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पाच्या इतिहासात प्रथमच कार्यकर्त्यांकडून चारही प्रवेशद्वार बंद करण्यात आली होती, तसेच कोळसा वाहतूक करणारी रेल्वे दिवसभर रोखण्यात आली, यामुळे कंपनीला मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले. 'हम करे सो कायदा'च्या भूमिकेत वावरणारे व्यवस्थापन गुल्हाने यांच्या ठाम उपोषणामुळे पुरते हतबल झाले होते. आमदार राजेश वानखडे सकाळपासून उपोषण स्थळी ठिय्या मांडून बसले होते. आमदारांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासन व रतन इंडिया व्यवस्थापनाशी थेट चर्चा केल्यानंतर अखेर रात्री दहाच्या सुमारास तोडगा निघाला. प्रकल्प प्रमुख पगलापती यांनी आमदार राजेश वानखडे यांना दिलेल्या लेखी पत्रात राखेमुळे झालेल्या शेती नुकसानीबाबत शासन नियमांनुसार व संबंधित यंत्रणांच्या अहवालातील तांत्रिक त्रुटी दूर करून कार्यवाही केली जाईल, प्रकल्पग्रस्त युवकांच्या रोजगाराबाबत शासन धोरणांनुसार व उपलब्ध पदांच्या अनुषंगाने निर्णय घेतला जाईल, प्रकल्पग्रस्त कामगारांच्या वेतनवाढीचा विषय कंपनीच्या अंतर्गत धोरणांनुसार व कामगिरीच्या आधारावर दरवर्षी विचारात घेतला जाईल, तसेच वाघोली गावातील राख प्रदूषणाबाबत सातत्याने नियंत्रण उपाययोजना राबविल्या जातील, अशी स्पष्ट हमी देण्यात आली आहे. यासोबतच जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित विभागांसोबत बैठक घेऊन झालेल्या चर्चेनुसार १५ दिवसांत केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात येईल, असेही नमूद करण्यात आले आहे. लेखी आश्वासन मिळताच आ. राजेश वानखडे यांनी विवेक गुल्हाने व सहकाऱ्यांना ज्यूस पाजून त्यांचे उपोषण सोडविले. कामगारांना त्यांच्या कष्टाचे पैसे तात्काळ मिळाल्याने कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कामगारांनी उपोषणकर्ते विवेक गुल्हाने व त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानत लढ्याचा विजय साजरा केला.

# काँग्रेसचे हर्षवर्धन सपकाळ यांना अमरावती व नागपूरच्या मनोरुग्णालयात भरती करण्याची वेळ आली आहे

प्रतिनिधी ८ जानेवारी

## ◆ चंद्रशेखर बावनकुळे यांची टीका

**अमरावती :** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना अमरावती आणि नागपूरच्या मनोरुग्णालयात भरती करण्याची वेळ आली असल्याची प्रतिक्रिया राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

यासंदर्भात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सकाळी पत्रपरिषद घेऊन महसूलमंत्र्यांना टार्गेट केले होते. त्यावर पत्रकारांनी विचारले असता बावनकुळे यांनी ही प्रतिक्रिया दिली.

सपकाळ हे बुलढाणा मध्ये आणि त्यांच्या गावातच हरतात.. सपकाळ सूर्यावर एक दिवा लावण्याचा प्रयत्न करतात.




असेही ते यावेळी म्हणाले.

नगरपरिषद निवडणुकीत हर्षवर्धन सपकाळ यांची काँग्रेस सिंगल डिजिट वर आली. अत्यंत किंचित किंचित होत चालली.

महानगरपालिका निवडणुकीत देखील काँग्रेस फार किंचित ठिकाणी दिसणार आहे

माझ्या ऐकण्यात आहे सपकाळ यांचा पद जाणार आहे.. इलेक्शन मध्ये त्यांचा परफॉर्मन्स चांगला नाही..त्यामुळे सपकाळ यांचं पद वाचवण्याकरिता राहुल गांधी कडून पद वाचवण्यासाठी ते मुख्यमंत्री फडणवीसनवर टीका करतात

आणि ते व्हिडिओ सपकाळ राहुल गांधींना पाठवतात.. राहुल गांधी तेवढी त्यांना शाबासकी देतात. त्यामुळे सपकाळ असे बोलतात

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर बोलण्याची लायकी हर्षवर्धन सपकाळ यांची नाही.

यानंतर सपकाळ जास्त जर बोलले तर ज्या जिल्ह्यात ते बोलतील त्या ठिकाणचा भाजपचा कार्यकर्ता त्याची दखल घेणार आहे. असेही चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.


यावेळी पत्र परिषदेला खासदार अनिल बोंडे, माजी पालकमंत्री प्रवीण पोटे, पक्षाचे निरीक्षक संजय कुटे, आमदार राजेश वानखडे, आमदार प्रताप अडसड, भाजपचे शहराध्यक्ष नितीन धांडे, भाजपचे प्रवक्ते शिवराय कुलकर्णी भाजपचे नेते जयंत डेहणकर, यांच्याभाजपचे वरिष्ठ नेते उपस्थित होते .

# स्वतःच्या सामर्थ्यावर आधारित भविष्याभिमुख अमरावती टेक पार्कची गरज – पद्मश्री डॉ. विजय भटकर

प्रतिनिधी ८ जानेवारी

## ◆ जिजाऊ बँक: डॉ. पंजाबराव देशमुख जयंती कार्यक्रम

**अमरावती :** डॉ. पंजाबराव देशमुख जयंतीच्या निमित्ताने पद्मभूषण डॉ. विजय भटकर, प्रख्यात संगणक शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि भारताच्या सुपरकॉम्प्युटिंग व डिजिटल शिक्षण चळवळीचे प्रमुख शिल्पकार, हे जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, अमरावती येथे आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होते.आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी अमरावतीसाठी स्पष्ट आणि भविष्याभिमुख दृष्टी मांडत, मुंबई व पुण्यासारख्या वित्तकेंद्रित किंवा केवळ आयटी सेवा मॉडेलची नक्कल न करता अमरावतीने स्वतःच्या ताकदीवर आधारित तंत्रज्ञान व स्टार्टअप विकासाचा मार्ग निवडावा, असे प्रतिपादन केले.



डॉ. भटकर यांनी संशोधनकेंद्रित स्टार्टअप व एआय टेक पार्क स्थापन करण्याबाबत युवा अभियंतासाठी प्रस्तावित केले. अमरावती व विदर्भाला नैसर्गिक व स्थानिक पातळीवर लाभ असलेल्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. ॲग्रीटेक, हवामान व जलव्यवस्थापन प्रणाली, गव्हर्नमेंट टेक (GovTech) आणि सर्व्हेटेक ही प्रमुख प्राधान्य क्षेत्रे असल्याचे त्यांनी सांगितले. ही क्षेत्रे विदर्भातील प्रत्यक्ष समस्यांवर उपाय देणारी असून त्याचबरोबर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विस्तारक्षम असल्याचे त्यांनी नमूद केले. मजबूत शैक्षणिक संस्थांच्या पाठबळासह राष्ट्रीय प्राधान्यांशी सुसंगत, मिशन-आधारित दृष्टिकोन स्वीकारल्यास नवोपक्रम समाज आणि सार्वजनिक हिताशी घट्टपणे जोडले राहतील, असे त्यांनी स्पष्ट केले. या प्रस्तावित उपक्रमाला राजकीय व प्रशासकीय स्तरावर भक्कम पाठबळ मिळत आहे.खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी एऊझ्य् आधारित एआय स्टार्टअप टेक पार्कसाठी सातत्याने पाठपुरावा केला असून, राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी या संकल्पनेस तत्त्वतः पाठिंबा दर्शवित राज्य शासनाच्या सहकार्याचे आश्वासन दिले आहे.यामुळे धोरणात्मक समन्वय, आवश्यक मंजुरी आणि जलद निर्णयप्रक्रियेला चालना मिळणार असल्याने सर्जनशील कृती आहे.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जिजाऊ बँकेचे अध्यक्ष ईजी. अविनाश कोठाळे यांनी या उपक्रमाचा संबंध डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याशी जोडत, शेतकरी कल्याण, सहकार, ग्रामीण शिक्षण आणि जल व शेती व्यवस्थापनातील त्यांच्या योगदानामुळे अमरावतीच्या सामाजिक-आर्थिक रचनेची पायाभरणी झाली,व अमरावती देशभरात शैक्षणिकतेने सुसंकृत व अग्रेसर असल्याचे सांगितले.

# ओबीसी सेल जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू लोडम यांचा पदत्याग

प्रतिनिधी ८ जानेवारी

**मुर्तिजापूर:** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ओबीसी विभाग जिल्हा कार्याध्यक्ष यांनी राष्ट्रवादी काँग्रेस प्राथमिक सदस्य व जिल्हा कार्याध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. वीस वर्षापासून पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते.



त्यांच्या कार्याची दखल घेत पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनामध्ये त्यांनी प्राथमिक सदस्य ओबीसी सेल तालुका अध्यक्ष जिल्हा कार्याध्यक्ष विधानसभा निरीक्षक अशा विविध पदावर कार्य केले पक्षाच्या माध्यमातून त्यांनी पंचायत समिती जिल्हा परिषद नगर परिषद राज्यसभा लोकसभा निवडणूक आयोजन नियोजनामध्ये सक्रिय सहभाग होता.

# अकोला महानगरपालिकाद्वारा शहरात काढण्यात आली रॅली

## ◆ महापालिका आयुक्त डॉ. सुनिल लहाने यांच्या नेतृत्वात उपक्रम

प्रतिनिधी ८ जानेवारी

**अकोला:** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अनुषंगाने अकोला महानगरपालिका क्षेत्रात मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. पाहूया एक विशेष वृत्तांत आज दि. ७ जानेवारी रोजी अकोला महानगरपालिका प्रशासनाव्दारा मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये जनजागृती पर वाहन, पथनाटय वाहन, आठ चित्ररथ व कचरा संकलन घंटागाडी, मोटर सायकल इत्यादीसह विविध जनजागृतीपर फलक रॅलीमध्ये समाविष्ट करण्यात आले होते. सदर रॅलीची सुरूवात अकोला महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय येथे मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.सुनिल लहाने आणि महाव्यवस्थापक प्रशासन डॉ.संजय गर्कल यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीची सुरूवात करण्यात आली.



तसेच सदर रॅली, ओपन थिएटर मार्गे फतेह चौक, संतोषीमाता मंदीर चौक, रामदास पेठ पोलीस स्टेशन मार्गे रेल्वे स्टेशन रोड, गड्डम प्लॉट, सातव चौक, गणेश स्वीट मार्ट, जठरपेठ चौक, होली क्रॉस शाळे समोरून रतनलाल प्लॉट, सिव्हील लाइन चौक मार्गे मोठे पोसस्ट ऑफिस ते नवीन बस स्थानका समोरून महानगरपालिका मुख्य कार्यालय येथे सामुहिकरित्या मतदान शपथ घेऊन सदर रॅलीचे समारोप करण्यात आले.यावेळी मनपा शिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी मतदार जनजागृती हरिश्चंद्र इटकर, शाम बगेरे, प्रवीण मिश्रा, जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा, संजय खराटे, मो.अनवार हुसैन, शे.नईम शे.हाशीम, अखिल अहमद, शेख शहजाद, इरफानुर्रहमान, इश्वर नानोटे, शेख साकिब, नावेद अहमद खान, गोकुल हरणे, युवराज पठाडे, खान अनीस खान, जहूर अहमेद नूर अहेमद, श्रीधर भिरड, अनिल महाजन, आकश बागडे, किशोर गुजर, वंदना महाजन, सुशिला सोनोने, हेमंत उपरीकर, संगीता गुजर, अ.शफीक अ.रफीक, यशवंत दुधांडे, अथर्व खराटे, विश्वनाथ सुतवणे यांचेसह मनपा अतिक्रमण विभाग, स्वच्छता विभाग, मोटर वाहन विभाग, शिक्षण विभागातील कर्मचा-यांची उपस्थिती होती.

# समाजसेवेचा वसा अन् विकासाचा ध्यास सागर भारुका खास

# शिवसेना उमेदवार सागर भारुका लढतात आहे मशाल चिन्हावर

प्रतिनिधी ८ जानेवारी

**अकोला:** राजकारण असो वा समाजकारण, जनसेवेचा वसा घेतलेले नेतृत्वच जनतेच्या गळ्यातील ताईत बनते. नगरसेवक नसताना प्रभाग अकरा मध्ये सागर भारुका यांनी अनेक विकास कामे केली. आता ते प्रभाग बारा ड मध्ये उभे असून त्यांच्या या विकास कामाचा धडका या प्रभागात देखील कायम राहिल असा विश्वास स्थानिक नागरिकांना आहे. प्रभाग ११ मध्ये सागर भारुका यांनी आपल्या अष्टपैलू कार्यातून विकासाचा नवा आदर्श निर्माण केला आहे. आरोग्य शिबिरांपासून ते क्रीडा स्पर्धांपर्यंत आणि धार्मिक उत्सवांपासून ते कोरोना काळात ६०० ते ८०० लोकांना किराणा किटच्या मदतीपर्यंत, भारुका यांच्या कार्याचा आढावा घेणारी ही विशेष बातमी...



अकोल्यातील प्रभाग ११ मध्ये गेल्या काही वर्षात विकासाची आणि समाजसेवेची मोठी गंगा वाहताना दिसत आहे. सागर भारुका यांच्या माध्यमातून प्रभागातील पाणीप्रश्न सोडवण्यासाठी तब्बल ३२ ते ३५ सबमर्सिबल पंप बसवण्यात आले आहेत, ज्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. केवळ विकासकामेच नाही, तर सामाजिक बांधिलकी जपण्यातही भारुका सदैव अग्रेसर राहिले आहेत. दरवर्षी रक्तदान शिबिर आणि मोफत नेत्र तपासणी शिबिरांचे आयोजन करून शेकडो गरजू रुग्णांना मदत केली जाते. प्रभागात दरवर्षी भजन, जम्मा जागरण आणि श्रावण महिन्यातील उपक्रमांची मोठी परंपरा त्यांनी जपली आहे. विशेषतः श्रावण सोमवारी कावडधारकांसाठी नाश्ता आणि कॉलेज परिसरात पिण्याच्या पाण्याची सोय करून त्यांनी सेवेचा आदर्श ठेवला आहे.सागर भारुका हे कोरोना संकट संकटकाळातही मागे राहिले नाहीत. कोरोना काळात सहाशे ते आठशे परिवाराला किराणा किटचे वाटप करत सागर भारुका यांनी विक्रम केला होता. सॅनिटायझेशन असो वा गरजूंना रेशन कीट वाटप, त्यांनी प्रभागातील प्रत्येक कुटुंबाला आधार दिला. क्रीडा क्षेत्रातही त्यांनी आपली मोहोर उमटवली असून, दरवर्षी भव्य क्रिकेट टूर्नामेंटचे आयोजन करून त्यांनी स्थानिक खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळवून दिले आहे. तसेच गणेशोत्सवात 'गणेश मूर्ती सजावट स्पर्धा' घेऊन त्यांनी संस्कृती आणि कलेला प्रोत्साहन दिले आहे. नगरसेवक नसताना प्रभाग अकरा मध्ये सागर भारुका यांनी कामाची गती वाढली. पण, आता सागर भारुका हे प्रभाग १२ ड मध्ये लढत असून प्रभाग अकरा प्रमाणे ते बारा प्रभागात देखील जनसेवक म्हणून उदयाला येतील असा विश्वास स्थानिकांना आहे.

या सर्व कामात सागर भारुका यांना मदत केली ती किरण ठाकूर, रणजीत ठाकूर, सोनु मिश्रा, विनोद गायकवाड, सुनील शुक्ला, शुभम तिवारी, देवा शर्मा, आकाश ठाकूर, दिलीप अग्रवाल, पारस खंडेलवाल, राजु शर्मा, संजय शाह, दिपक खत्री, मन्नु अग्रवाल, महेंद्र ठाकूर, पवन जोशी, गोलू खोलिया, कृष्णा तिवारी, आकाश गावंडे, पंकज ढाबाडे, शाम शाहू, देवेंद्र वखारीया, शेरु मिश्रा, संतोष उटाले, नारायण तायडे, आकाश मिश्रा, योगेश भानुशाली, विकास तिवारी, आयुष श्रीवाल, लोकेश राऊत, संदीप ठाकूर, भरत केजडीवाल, अंकुश ठाकूर, कैलास तिवारी, पप्पू अण्णा, सुभाष चौधरी, जिग्नेश मेहता, दीपक पाटील, दूर्गा श्रीवास्तव, राजकमल ठाकूर आदींनी काम केले.

# महापालिका निवडणूकीत भाजपचा अकोल्यात 'विजय रथ' रवाना

## ◆ भाजपा आमदार रणधीर सावरकरांचा विजयाचा निर्धार

प्रतिनिधी ८ जानेवारी

**अकोला:** अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत भारतीय जनता पक्षाने प्रचारात आघाडी घेतली आहे. 'विकास' हाच केंद्रबिंदू मानून भाजपने आपला 'विजय रथ' मैदानात उतरवला असून, आमदार रणधीर सावरकर यांनी विजयाचा ठाम विश्वास व्यक्त केला आहे.



अकोल्यात भारतीय जनता पक्ष कार्यालयासमोरून आज 'विजय रथाला' मोठ्या उत्साहात हिरवी झेंडी दाखवण्यात आली. यावेळी बोलताना आमदार रणधीर सावरकर म्हणाले की, भाजप कोणावरही वैयक्तिक टीका न करता सकारात्मक आणि विकासात्मक कामांच्या जोरावर निवडणुकीला सामोरे जात आहे. अकोलेकरांच्या भावना, त्यांचा स्वाभिमान आणि शहराचा कायापालट करण्याची हमी भाजपने दिली आहे. गेल्या ८ वर्षांत आमदार गोवर्धन शर्मा, रणधीर सावरकर, माजी मंत्री संजय धोत्रे आणि खासदार अनुप धोत्रे यांच्या माध्यमातून झालेली विकासकामे आता 'व्हिडिओ व्हॅन'द्वारे प्रत्येक प्रभागात पोहोचवली जाणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयंत मसने होते. अकोल्यात भाजप महिला आघाडीने प्रचाराचा धडाका लावला असून, सुवासिनीताई धोत्रे यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली आहे. विरोधकांकडे शहराच्या विकासासाठी कोणतेही व्हिजन नसून ते केवळ गप्पा मारत असल्याचा टोला त्यांनी लगावला. 'जनता आणि कार्यकर्ते हीच भाजपची ताकद असून, अकोल्याचे मतदार विकासाच्या बाजूने कौल देतील,' असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.या जनसंपर्क मोहिमेत अर्चनाताई शर्मा, मंजुषाताई सावरकर, चंदाताई ठाकूर, स्मिता कायंदे, सोनल ठक्कर यांच्यासह महिला आघाडीच्या अनेक रणरागिणी जोमाने सहभागी झाल्या होत्या. घराघरात जाऊन भाजपची विकासकामे पोहोचवण्यावर या मोहिमेत भर दिला जात आहे.

# प्रभाग १६ मध्ये भाजपचा विजयाचा संकल्प

## ◆ डॉ. मुस्कान पंजवानी आश्वासक चेहरा आला समोर

प्रतिनिधी ८ जानेवारी

**अकोला:** अकोला महानगरपालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर,सिंधी कॅम्प परिसरातील प्रभाग क्रमांक १६मधील भारतीय जनता पक्षाच्या निवडणूक प्रचार कार्यालयाचे भव्य उद्घाटन खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर आणि भाजप महानगर अध्यक्ष जयंतराव मसने यांच्या हस्ते पार पडले.

प्रचार कार्यालयात उद्घाटन प्रसंगी बोलताना खासदार अनुप धोत्रे यांनी पंतप्रधान मोदींच्या जनकल्याणकारी योजनांची माहिती दिली. केंद्र सरकारच्या माध्यमातून अकोल्यात रस्ते, रेल्वे आणि अमृत योजनेचा विकास झाला असून, हे काम पुढे नेण्यासाठी भाजपला विजयी करा,' असे आवाहन त्यांनी केले. आमदार रणधीर सावरकर यांनी राज्य सरकारच्या 'डबल इंजिन' ताकदीचा उल्लेख करत,



अकोल्याच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपच सक्षम असल्याचे सांगितले. 'राजकारण ही माझ्यासाठी सत्ता नसून सेवा आहे,' असे सांगत डॉ. मुस्कान आशिष पंजवानी यांनी प्रभाग १६ साठी आपला जाहीरनामा मांडला. दर्जेदार रस्ते, शुद्ध पाणी, महिला सुरक्षा, कौशल्य प्रशिक्षण आणि तरुणांसाठी डिजिटल लायब्ररी यांसारख्या सुविधा देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.या सोहळ्याला हरीश आलिमचंदानी, विनोद मनवानी, रमेश जग्यासी, कन्हैयालाल रंगवानी, नानकराम राजपाल, हीरालाल कृपलानी, सुरेन्द्र नागदेव यांच्यासह शेकडो पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते. प्रभाग १६ मध्ये कमळ फुलवण्यासाठी कार्यकर्त्यांनी आता कंबर कसली आहे.

# समाजाला न्याय मिळवून देणारी पत्रकारिता करा : आ. हरीश पिंपळे

प्रतिनिधी ८ जानेवारी

**मुर्तिजापूर:** लोकशाहीच्या चौथा स्तंभ मानल्या जाणारी पत्रकारिता व समाजाला न्याय मिळवून देणारे पत्रकारिता करावी असे प्रतिपादन आमदार हरीश पिंपळे यांनी केले. पत्रकार दिन कार्यक्रमात ते बोलत होते.

नगराध्यक्ष हर्षल साबळे, जेष्ठ पत्रकार अविनाश बेलाडकर, दिलीप देशमुख, प्रा. दीपक जोशी, विलास मुलमुले, पी. एन. बोळे, भारत जेठवाणी, भाजप तालुका अध्यक्ष नंदकिशोर राऊत, तालुका अध्यक्ष ठाकरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.



अविनाश बेलाडकर, दिलीप देशमुख यांनी मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन अन्वर खान यांनी केले तर आभार सुधीर दुबे यांनी मानले. यावेळी भाजपचे गटनेते गजानन नाकट, नगरसेवक सचिन देशमुख, अमोल प्रजापती, रितेश सबाजकर, कोमल तायडे, लखन मिलांदे, नगरसेवक मुकेश काळपांडे, पंकज कांबे, नगरसेविका शालिनीताई हजारे, रामा हजारे, निलेश वानखडे, राम खंडारे, विजय डोईफोडे, प्रमोद काळे, अविनाश येवले, विनोद गणेशपुरे, रोहित अवलवार, योगेश फरसुले उपस्थित होते.

# काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्यावर जीवघेणा हल्ला; उपचारादरम्यान मृत्यू

वि. प्रतिनिधी ८ जानेवारी

**अकोट:** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्यावर करण्यात आलेल्या जीवघेण्या हल्ल्यात उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याने अकोट तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात राजकीय व सामाजिक वातावरण ढवळून निघाले आहे.

या हत्येप्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांचे जिल्हाध्यक्ष बद्रू जमा, संजय बोडखे आणि राजीव बोचे हे हत्येमागील मुख्य सूत्रधार असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात आतापर्यंत एकूण सहा आरोपींची नावे असल्याची माहिती आहे.

दरम्यान, हिदायत पटेल यांचे पार्थिव अंतिम संस्कारासाठी मोहाळा येथे आणले.



अंत्यसंस्काराच्या पार्श्वभूमीवर तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. यावेळी आंदोलनकर्ते व नातेवाईकांना पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी आश्वासन दिले.

पोलीस अधीक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील मुख्य आरोपीला अटक करण्यात आली आहे.घटनेचा तपास आयपीएस दर्जाचे अधिकारी, अकोटचे एसडीपीओ निखिल पाटील करणार आहेत.

मुख्य मारेकरी आरोपीची नार्को टेस्ट करण्यात येणार आहे. सर्व संशयित आरोपींचे मोबाईल SDR, CDR तसेच व्हॉट्सॲप कॉल्ससह डिजिटल तपास केला जाणार आहे.

संपूर्ण घटनेची निष्पक्ष व सखोल चौकशी केली जाईल, असे स्पष्ट आश्वासन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दिले आहे. पोलिस सूत्रांनुसार, या हल्ल्याचा मुख्य मारेकरी म्हणून उबेद पटेल याचे नाव पुढे आले आहे. त्याला हत्येसाठी साथ देणारा त्याचा चुलत भाऊ फाजीलखा पटेल यांचाही या गुन्ह्यात सहभाग असल्याचा आरोप आहे. यासह इतर संशयित आरोपींवरही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी हिदायत पटेल यांच्या भावाने केली आहे.

दरम्यान, मोहाळा येथे शोकाकुल वातावरणात हिदायत पटेल यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्ययात्रेत विविध राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# शेगावात माळी समाजाचे ३२ वे राज्यस्तरीय युवक-युवती परिचय महासंमेलन

प्रतिनिधी ८ जानेवारी

**बाळापूर :** माळी समाज बहुउद्देशीय मंडळ शेगाव, युगपुरुष महात्मा फुले प्रतिष्ठान,अकोला आणि माळी सेवा मंडळ खामगावच्या वतीने माळी समाजाचे ३२ वे राज्यस्तरीय युवक-युवती परिचय महासंमेलन १०, ११ व १२ जानेवारी असे तीन दिवस संत नगरी शेगाव येथील संत सावता नगर, नयोदय विद्यालयाजवळ आयोजित करण्यात आले आहे.

माजी आमदार लक्ष्मणराव तायडे आणि माजी आमदार कृष्णराव इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. या सोहळ्यासाठी खामगाव विभागातून अध्यक्षपदी प्रदीप सातव, तर अकोला विभागातून कार्याध्यक्षपदी गणेशराव वैराळे तसेच सचिव दीपक रौंदळे, विकास बगाडे यांची निवड झाली. डॉ. शंकरराव क्षीरसागर, जयंत मसने, संगीताताई अढाऊ, सुरेश गिऱ्हे, श्रीकृष्ण बोळे, बंडूभाऊ इंगळे, प्राचार्य दिनेश तायडे, संजय वानखडे,प्रा. नितीन देऊळकर, अनिल गिऱ्हे, आत्माराम जाधव, ॲड. शंकरराव गिऱ्हे, गोपाल तायडे, गजानन निमकर्डे, नितीन इंगळे, सुधीर उगले, डॉ. चंद्रकांत बोळे, राजेश तायडे, विजय क्षीरसागर, विनोद इंगळे यांसह इतर पदाधिकाऱ्यांनी, समाज बांधवांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

यावर्षीच्या 'सोयर' परिचय पुस्तिकेत २०४५ युवक-युवतींची विक्रमी नोंदणी झाली असून यामध्ये ११०० मुली आणि ९४५ मुलांचा समावेश आहे. यामध्ये महाराष्ट्र, मध्य प्रदेशसह इतर राज्यातील तसेच विदेशातीलही स्थळांचाही यात समावेश आहे. विशेष म्हणजे तीन दिवस चालणाऱ्या या सोहळ्याला महाराष्ट्र राज्यातील जवळपास ३० ते ४० हजारांपेक्षा जास्त समाजबांधव आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहतील.

समाज बांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन महासंमेलनाचे अध्यक्ष प्रदीप सातव, कार्याध्यक्ष गणेशराव वैराळे आणि सचिव विकास बगाडे व दीपक रौंदळे यांनी सांगितले की, ठमाळी समाजाचे हे ३२ वे वर्ष असून समाजातील उपवर युवक-युवतींना योग्य जोडीदार निवडण्यासाठी हे एक हक्काचे व्यासपीठ आहे.

# मेरा युवा भारत केंद्राच्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न

प्रतिनिधी ८ जानेवारी

**तेल्हारा:** विवेकानंद युवा बहुउद्देशीय मंडळ पाथर्डीच्या वतीने जिल्हा युवा अधिकारी महेश सिंग शेखावत यांच्या मार्गदर्शनात मंडळ अध्यक्ष प्रदीप राऊत यांच्या नेतृत्वात ५,६ जानेवारी रोजी क्रीडा संकुलात तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा झाल्या. छत्रपती शिवाजी महाराज व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करून कार्यक्रमाचे उद्‌घाटक पोलिस कॉन्स्टेबल वैष्णवी काळे आणि दामिनी पथकाच्या शामल येडे यांच्या हस्ते व प्रा. आशिष वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. नगरसेवक सतीश जयस्वाल, रुपेश चव्हाण, एस. के. अकॅडमीचे संचालक सचिन गव्हाळे, उज्वला उजवणे, शामल पवार,राठोड, क्रीडा संकुलचे श्रीकृष्ण वायकर, प्रदीप राजुस्कर, शिवनेरी अकॅडमीचे सतीश आमटे, प्रथमेश तारमेकवार यांच्या उपस्तितीत असून या कार्यकमा मध्ये सचिन गव्हाळे व आशिष वानखेडे यांनी युवकांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक विवेकानंद युवा बहुउद्देशीय मंडळाचे अध्यक्ष प्रदीप राऊत



यांनी केले. मेरा युवा भारत केंद्राच्या माध्यमातून सांघिक आणि वैयक्तिक खेळ घेण्यात आले. या सर्व युवक युवती खेळाडूंना पारितोषिक सुवर्णपदक, रोप्यपदक, कास्यपदक प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन प्रदीप राजुस्कर यांनी तर आभार प्रदर्शन विवेकानंद युवा बहुउद्देशीय मंडळ पाथर्डी चे अध्यक्ष प्रदीप राऊत यांनी मानले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सुदर्शन ठाकूर, राजे संभाजी अकॅडमी, लक्ष अकॅडमी, एसके अकॅडमी, शिवनेरी फिजिकल अकॅडमी, टारगेट फिजिकल अकॅडमी दानापूर यांचे सहकार्य लाभले.

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

गुरुवार, दि. ८ जानेवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com




## → संक्षिप्त...



### दारव्हा पालिकेच्या नगराध्यक्षपदी सुनील चिरडे

प्रतिनिधी ०८ जानेवारी

**दारव्हा :** दारव्हा नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षपदी सुनील नामदेवराव चिरडे यांनी बुधवारी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. त्यांच्या पदग्रहणाचा सोहळा शहरात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या निमित्ताने शहरातून रामगाव रामेश्वर येथील प्रख्यात भिकमपुरी हरीपाठ्यासह मिरवणूक काढण्यात आली. नगर परिषद कार्यालयासमोर नगराध्यक्षांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर मुख्याधिकारी विठ्ठल केदारे यांच्या उपस्थितीत सुनील चिरडे यांनी पदाचा कार्यभार स्वीकारला. पदग्रहण समारंभास शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख श्रीधर मोहोड, जिल्हाप्रमुख यशवंत पवार, तालुकाप्रमुख मनोज सिंगी, शहरप्रमुख राजू दुधे, उपशहरप्रमुख आनंद झोळ, गणेश दुबे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पदग्रहणानंतर बोलताना नगराध्यक्ष सुनील चिरडे यांनी दारव्हा शहराच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले जाईल, असे स्पष्ट केले. पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासनाच्या माध्यमातून पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा व विकासकामे प्रभावीपणे राबविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रम उत्साहात पार पडला.

### मांगकिन्ही येथे शेतकऱ्याची आत्महत्या

प्रतिनिधी ०८ जानेवारी



**दारव्हा :** तालुक्यातील मांगकिन्ही येथे कर्जबाजारीपणा कंटाळून शेतक-याने आत्महत्या केली. ही घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली. महादेव नामदेव लाव्हरे (६२, रा. मांगकिन्ही) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. लाव्हरे यांच्यावर स्टेट बँक ऑफ इंडियाचे कर्ज होते. त्यांच्या शेतात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतून विहीर मंजूर झाली होती. विहिरीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतरही स्वतःची तसेच इतर मजुरांची मजुरी मिळावी यासाठी त्यांनी संबंधित कार्यालयांकडे वारंवार पाठपुरावा केला होता. मात्र दीर्घकाळ रक्कम न मिळाल्याने ते मानसिक तणावात होते, अशी माहिती आहे. घटनेनंतर परिसरात शोककळा पसरली असून त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. शासकीय यंत्रणांनी प्रकरणाची चौकशी करून कुटुंबीयांना तातडीची मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.

# यवतमाळ नगर पालिका : सभापती पदाची लॉटरी कुणाला लागणार ?

## उपाध्यक्ष, स्विकृत सदस्य, सभापतींसह विषय समित्यांची निवड उद्या

प्रतिनिधी ०८ जानेवारी

**■ यवतमाळ : नगर परिषदची निवडणूक पार पडली असून, नगराध्यक्षपदी ॲड प्रियदर्शनी उईके यांनी आपल्या पदाचा पदभार घेतला आहे. आता शुक्रवार ९ जानेवारी रोजी सभापती, उपाध्यक्ष व विषय समिती व स्विकृत नगरसेवकांची निवड होणार आहे. यामध्ये कोणाला लॉटरी लागणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

यवतमाळ नगर पालिकेत भाजपाच्या नगराध्यक्ष व २८ नगरसेवक, प्रहार जनशक्तीचे २, बिएसपी १, अपक्ष १, काँग्रेस १५, शिंदे सेना ७, एमआयएम १, वंचित बहुजन आघाडी ३ असे पक्षीय बलाबल आहे. भाजपाने सत्तास्थापन करण्यासाठी शहर विकास आघाडी स्थापन केली आहे. काही दिवसापूर्वी नगराध्यक्ष पदाचा ॲड. प्रियदर्शनी उईके यांनी पदभार घेतला आहे. दरम्यान उद्या शुक्रवारी ९ जानेवारी रोजी उपाध्यक्ष, सभापती, विषय समिती व स्विकृत नगरसेवकांची निवड प्रक्रीया पार पडणार आहे. उपाध्यक्षपदासाठी जेष्ठ नगरसेवक सुभाष राय व दत्ता कुळकर्णी, मुन्ना दुबे यांच्या नावाची चर्चा आहे. पाच स्विकृत सदस्यांची निवड करण्यात येणार आहे. यामध्ये भाजपाकडून स्विकृत सदस्यपदासाठी जगदिश वाधवाणी, अमोल देशमुख, रेखा कोठेकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. तसेच आरोग्य, बांधकाम, नियोजन, महिला बाल कल्याण, स्थाई समिती सभापती पदाची निवड करण्यात येणार आहे. यामध्ये सभापती पदाच्या निवडीचा चेंडू भाजप नेते माजी मंत्री मदन येरावार यांच्या दरबारात असून, कोणाला लॉटरी लागणार हे उद्या स्पष्ट होणार आहे. तर प्रहारचे बिपिन चौधरी यांना सभापती पदाची लॉटरी लागण्याची शक्यता आहे.

**सभापती निवडीचा चेंडू 'भाउ' च्या दरबारात**

**शिंदे सेनेला सभापतीपद ?**

यवतमाळ नगर पालिकेत भाजपने सत्ता स्थापन केली असून, शिंदे सेनेला सत्तेपासून दुर ठेवण्याचा प्रयत्न होत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. मात्र शिंदे सेनेला एक सभापती पद देण्यावर भाजपाच्या गोटात विचार विनीमय सुरु असल्याची माहिती सुत्रांनी दिली.

**काँग्रेसकडून दोघाच्या नावाची चर्चा**

यवतमाळ नगर पालिकेत काँग्रेसचे १५ नगरसेवक आहेत. नगर पालिकेत स्विकृत सदस्यांची निवड करण्यात येणार आहे. त्यासाठी जाकीर भाई व संतोष बोरले यांची नावे आघाडीवर आहे.

# ग्रामपंचायत अधिकाऱ्यावर हल्ला

## कारवाई न झाल्यास ९ जानेवारीपासून कामबंद



प्रतिनिधी ०८ जानेवारी

**झरी जामणी :** झरी–जामणी तालुक्यातील मुकुटबन ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी पोतरेड्डी नागराज बद्दमवार यांच्यावर शासकीय कामकाज सुरू असताना झालेल्या हल्ल्याने तालुक्यातील प्रशासकीय यंत्रणेत खळबळ उडाली आहे. विकासकामांची पाहणी करत असताना संबंधित व्यक्तींनी कामात अडथळा आणत मारहाण, अश्लील शिवीगाळ तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

ही घटना ४ जानेवारी २०२५ रोजी दुपारी सुमारे तीनच्या सुमारास घडली. घटनेनंतर ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी पंचायत समिती गाठून वरिष्ठांना प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर मुकुटबन पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करण्यात आली. या तक्रारीवरून गणेश चिंतावर यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १३२, १३२(१), २९६ व ३५१(२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

मुकुटबन ग्रामपंचायत मागील काही वर्षांपासून वादग्रस्त ठरत असून, थेट ग्रामपंचायत अधिकाऱ्यावर हल्ला झाल्याने कर्मचारी वर्गात भीतीचे वातावरण आहे.

या घटनेच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघटना (DNE 936), शाखा झरी–जामणी यांनी प्रशासनास निवेदन दिले आहे. दोषींवर तात्काळ कठोर कारवाई व अटक न झाल्यास ९ जानेवारीपासून तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी कामबंद आंदोलन करतील, असा इशाराही देण्यात आला आहे.

# पोलीस रेजिंग डे : पुसद पोलीस ठाण्यात मोफत आरोग्य तपासणी

प्रतिनिधी ०८ जानेवारी

**पुसद :** महाराष्ट्र पोलीस दलाच्या वर्धापन दिनानिमित्त (पोलीस रेजिंग डे) ६ जानेवारी २०२५ रोजी पुसद पोलीस उपविभागात कार्यरत पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी विशेष मोफत आरोग्य तपासणी (फुल बॉडी चेकअप) शिबिर आयोजित करण्यात आले.

शिबिरात पुसद पोलीस उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन व शाखांमधील अधिकारी व अंमलदारांनी त्यांच्या कुटुंबीयांसह सहभाग घेतला आणि वैद्यकीय तपासणी केली. डॉक्टर व त्यांचे पथक यांनी ब्लड शुगर, रक्तदाब (बी.पी.), डोळ्यांची तपासणी, लिपिड प्रोफाईल व इतर महत्त्वाच्या तपासण्या सर्वांना मोफत करण्यात आल्या.



शिबिरात एकूण ८५ ते ९० पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांच्या कुटुंबीयांनी लाभ घेतला. या उपक्रमाचे आयोजन पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक. अशोक थोरात आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बी. जे., पुसद यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शिबिराचे यशस्वी आयोजन पुसद (शहर) पोलीस ठाण्याचे ठाणेदार पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे, वसंतनगर पोलीस ठाण्याचे ठाणेदार सतीश जाधव, पुसद ग्रामीण पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुरेंद्र राऊत, खंडाळा पोलीस ठाण्याचे ठाणेदार सहा. पो. निरीक्षक विनीत घागे] वाहतूक नियंत्रण शाखेचे प्रभारी सहा. पो. निरीक्षक चौधरी यांच्या प्रभावी नियोजनाने यशस्वीपणे पार पडले.

# केवायसीत अडकला 'लाडक्या बहिणी'चा हप्ता

## जन आंदोलन आधार संघर्ष समितीने दिला आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी ०८ जानेवारी



**महागाव :** राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे जिल्ह्यातील हजारो महिलांना तात्काळ आर्थिक मदत मिळू शकलेली नाही. KYC कागदपत्रांची प्रक्रिया पूर्ण होण्यास विलंब झाल्याने पात्र महिलांचा हप्ता अडकला आहे.

ग्रामीण भागातील महिलांना इंटरनेट, आधार-पॅन जोडणी आणि सेवा केंद्रांची कमतरता यामुळे KYC प्रक्रिया वेळेत पार पडली नाही. या समस्यांचा विचार न करता शासनाने कोणतीही मुदतवाढ देण्यास नकार दिला आहे, ज्यामुळे अनेक महिलांना हक्का पासून वंचित राहासवे लागत आहे. या बाबत जन आंदोलन आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश नरवाडे यांनी प्रशासनावर तीव्र टीका केली आहे. त्यांनी तहसीलदार अभय मस्के यांना निवेदन देत प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "महिलांसाठी असलेल्या या योजनेत कागदपत्रांची अडचण का? प्रशासनाच्या या निष्काळजीपणामुळे गरीब आणि ग्रामीण महिलांवर अन्याय होत आहे," असे नरवाडे म्हणाले. सर्वात मोठा मुद्दा KYC प्रक्रिया करताना महिलांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागला. 30 आणि 31 डिसेंबर रोजी मोबाईलवर OTP न येण्याची समस्या तसेच सर्वरची गडबड यामुळे प्रक्रिया अपूर्ण राहिली. त्यावर मस्के यांनी सांगितले की, मुंबईतील हेड प्रमुख जाधव यांच्याशी संपर्क साधण्यात आले असून, लवकरच समस्येचे निराकरण होईल, अशी अपेक्षा आहे. तथापि, जर महिलांना तात्काळ लाभ न मिळाला, तर जन आंदोलन आधार संघर्ष समितीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नरवाडे यांनी दिला आहे. "जोपर्यंत महिलांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत हे आंदोलन थांबणार नाही" असेही ते म्हणाले.

# माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशनतर्फे ८४ पत्रकारांचा सन्मान

प्रतिनिधी ०८ जानेवारी

**पुसदः** माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन, पुसद यांच्या वतीने ६ जानेवारी रोजी पत्रकार दिनानिमित्त गाडगेबाबा स्मृतीस्थळ, पार्डी रोड निंबी येथे पुसद शहरातील ८४ पत्रकारांचा सत्कार करून सन्मान करण्यात आला. पत्रकार समाजाच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून दत्तात्रय बापूरावजी जाधव, पंकज पाल महाराज, दिगंबर जगताप, तहसीलदार रेखाताई मोहिते, शेख मकसूद आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन



यशवंत देशमुख यांनी केले.यावेळी मान्यवरांनी पत्रकारांच्या निःस्वार्थ कार्याचे कौतुक करत समाज घडविण्यात पत्रकारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे मत व्यक्त केले. तसेच शहीद पत्रकार दिनेश देविदास खांडेकर यांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमानंतर उपस्थित पत्रकार बांधव व मान्यवरांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामुळे कार्यक्रमाला अधिक आपुलकीचे स्वरूप प्राप्त झाले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास पत्रकार बांधवांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# निंबाळा बुद्रुक शाळेत आनंद मेळावा उत्साहात

## कमवा व शिका उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी प्रदर्शित केले कौशल्य

प्रतिनिधी ०८ जानेवारी

**वणीः** ३ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, निंबाळा बुद्रुक येथे कमवा व शिका या उपक्रमांतर्गत आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. याचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये व्यवहारज्ञान, श्रमप्रतिष्ठा व स्वावलंबनाची भावना वाढविणे हा होता.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादनाने झाली. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन गावचे प्रथम नागरिक सरपंच गिरधरजी आगलावे यांच्या हस्ते करण्यात आले. आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे छोटे दुकाने लावली होती. यात पाणीपुरी, पपई वडे, गुलाबजामुन, आप्पे, पुरी-भाजी, सोनपापडी, चिवडा, पोहे, भजी अशा



अनेक पदार्थांचा समावेश होता. या मेळाव्यास परिसरातील विविध शाळांनी सहभाग घेतला, ज्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ढाकोरी, बोरी, गोवारी पार्डी व देऊळवाडा यांचा समावेश होता. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक व पालक यांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल मुके यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक मयूर दशरथकर यांनी केले. वस्तुस्थिती दर्शविते की, या आनंद मेळाव्याने विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा व आत्मविश्वास जागविला, आणि त्यास ग्रामस्थांनीही भरपूर प्रतिसाद दिला.

# 'सोनेरी टोळी'ला नागरिकांचा चोप

## व्हिडिओ व्हायरल, परिसरात तणाव

प्रतिनिधी ०८ जानेवारी

**महागाव :** महागाव तालुक्यातील दहिसावळी परिसरात गुप्तधनाच्या शोधासाठी आलेल्या संशयित टोळीला संतप्त ग्रामस्थांनी चांगलाच चोप दिल्याची घटना नुकतीच घडली. या घटनेचे फोटो आणि व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

दहिसावळी येथील गावंडे यांच्या शेतशिवारात रात्री बारानंतर काही इसम संशयास्पद हालचाली करत असल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. पाहणी केली असता, संबंधितांनी लिंबू, मिरची तसेच पूजेचे साहित्य टाकून एका ठिकाणी सुमारे दहा फूट खोल खड्डा खोदल्याचे आढळून आले.



गुप्तधनाच्या अंधश्रद्धेतून सुरू असलेल्या या प्रकारामुळे ग्रामस्थांचा संताप अनावर झाला.खड्डा खोदत असतानाच नागरिकांनी या इसमांना रंगेहाथ पकडून त्यांना मारहाण केली. घटनेदरम्यान काही नागरिकांनी मोबाईलवर फोटो व व्हिडिओ चित्रीत केले. हे व्हिडिओ समाजमाध्यमांवर झपाट्याने व्हायरल झाल्यानंतर घटनास्थळी मोठी गर्दी जमली आणि वातावरण तणावपूर्ण बनले. नागरिकांची संख्या वाढताच टोळीतील काही इसमांनी अंधाराचा फायदा घेत पळ काढला. मात्र एक-दोन जणांना पकडून गावात आणण्यात आले. सरपंच आणि पोलीस पाटील यांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला; मात्र संतप्त जमावामुळे त्या इसमांनाही मारहाण झाली. या टोळीत गावातील दोन, जवळा येथील दोन तसेच यवतमाळ येथील दोन इसमांचा समावेश असल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेनंतर रात्री उशिरापर्यंत दहिसावळी गावात तणावाचे वातावरण होते. गुप्तधनाच्या नावाखाली वाढणारी अंधश्रद्धा आणि कायदा हातात घेण्याच्या प्रवृत्तीबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# मराठी विश्व साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी अजय नरवाडे

प्रतिनिधी ०८ जानेवारी

**उमरखेड :** सामाजिक, राजकीय, धार्मिक तसेच विविध क्षेत्रांत गेली दोन दशके सक्रिय योगदान देत समाजोपयोगी उपक्रम राबविणारे आणि साहित्याचे अभ्यासक म्हणून ओळख असलेले अजय नरवाडे यांची भूतान येथे होणाऱ्या दहाव्या शब्द मराठी विश्व साहित्य संमेलनाच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे उमरखेड शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. नरवाडे यांनी यापूर्वी मलेशिया, श्रीलंका, इंडोनेशिया, दुबई आणि थायलंड येथील साहित्य संमेलनांत सहभाग घेत साहित्यिक मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची आणि साहित्य क्षेत्रातील योगदानाची दखल घेत ही निवड करण्यात आली. १० ते



१७ जानेवारी २०२६ या कालावधीत सात दिवस चालणाऱ्या या मराठी विश्व साहित्य संमेलनात भारतातील अनेक नामवंत साहित्यिक उपस्थित राहणार असून हा सोहळा ऐतिहासिक ठरण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शब्द परिवाराचे अध्यक्ष संजय सिंगलवार आणि उपाध्यक्ष शशी डंबारे यांनी नरवाडे यांच्या कार्याची दखल घेत उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली. या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार श्रीमती संगिता गजानन गेडाम रा. डोंगरखर्डा ता. कळंब जि. यवतमाळ यांनी त्यांचे स्वतःचे/नाते संबंधातील व्यक्तीच्या/ स्वतःचे मुलाचे जन्माची नोंद ग्राम पंचायत डॉगखर्डा, दप्तरी घेणे करिता निर्देशित करणे कामी अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार यांचा मुलगा नामे गौरव गजानन गेडाम याचा जन्म दिनांक 21.05.2008 रोजी मोजा डोंगरखर्डा, येथे राहत्या घरी झाला असा अर्जदारांचा दावा आहे. त्याचप्रमाणे अर्जदार यांचे जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे असल्याबाबत आवश्यक त्यांनी अर्जात नमूद केले आहे. त्याअर्थी मी दंडाधिकारी तथा अपर तहसिलदार, मेटीखेडा ता. कळंब उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३ आणी ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मी अपर तहसिलदार, मेटीखेडा ता. कळंब प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की. सदर व्यक्तीचा जन्म बाबत नोंद घेणे कामीचा आदेश देणे करिता व गृह चौकशी करणे कामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्यतो पुरावा किंवा साक्षीदारांसह दंडाधिकारी, मेटीखेडा ता. कळंब यांचे न्यायालयात स्वत जातीने वकीला मार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामा प्रसिद्ध दिनांका पासून पंधरा दिवसाचे आत सादर करावे. उक्त कालावधीत कुठलाही आक्षेप/उजर/विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्म बाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणे बाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदी बाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

(शिक्का)

**स्वा./-**
**दंडाधिकारी, तथा अपर तहसिलदार,**
**मेटीखेडा ता. कळंब**

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरूवार दि.८ जानेवारी २०२६

## अर्धे तुम्ही अर्धे आम्ही अधिकाऱ्यांची मनमानी

# 'पोकरा' योजनेची केली धूळधानी !


## सखोल चौकशी करून कारवाई झालीच पाहिजे, शेतकऱ्यांची मागणी

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या शेलुखडसे येथील पोखरामधील गैरप्रकरणाने आता नवे वळण घेतले आहे.दिवसागणिक नवनवीन प्रकरणे समोर येत असून ज्या लाभार्थ्यांनी योजनेच्या निकषाप्रमाणे सर्व साहित्य खरेदी केले आहे.परंतु कमिशन देण्यास स्पष्ट नकार दिला होता अशा लाभार्थ्यांना जाणीवपूर्वक मानसिक त्रास दिला गेला असल्याची माहिती बोरखेडी येथील एका लाभार्थ्याने दिली आहे.सदर लाभार्थ्याने कुठलेही कमिशन देण्यास स्पष्ट नकार दिल्यामुळे त्या लाभार्थ्याच्या बँक खात्यात ठिंबक घटकाचे ९० हजार अनुदान जमा करण्याऐवजी फक्त ६० हजार रुपये जमा करण्यात आले असल्याची माहिती सुद्धा समोर येत आहे. तर ज्यांनी सरळ सरळ कमिशन दिले अशा लाभार्थ्यांनी कुठलेही साहित्य खरेदी न करता केवळ जीएसटी देयके जोडून शासकीय अनुदानाची खिरापत वाटली असल्याचे वास्तव शेलुखडसे येथील कथित गैरप्रकारामुळे आता उघड होत आहे.सदर गंभीर प्रकाराची सखोल आणि कसून चौकशी झाली तर लाखोंचा नव्हे; करोडोचा भ्रष्टाचार उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.परिणामी समोर येत असलेल्या प्रकारामुळे नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना अर्थात पोखरा या महत्वाकांक्षी योजनेची अर्धे तुम्ही अर्धे आम्ही हे धोरण अवलंबून योजनेची धूळधानी केली असल्याची बोंब सर्वत्र होत आहे. त्यामुळे चौकशीसाठी नेमलेले तपास अधिकारी वरिष्ठांकडे काय अहवाल सादर करतात याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### प्रकल्पातील काही ठळक अनियमितता ...

पोकरा प्रकल्पाच्या निकषानुसार लाभाचे दोन गट पडतात. त्यात सामूहिक शेतकरी गट व वैक्तिक लाभ असे दोन गट पाडण्यात आले आहेत. ज्या गटाच्या नावावर लाखो रुपयाचे अनुदान लाटले आहे. तो सामूहिक गट सक्रिय असणे आवश्यक असून सदर गटाची मासिक नियमितता रजिष्टरवर नोंद असणे बंधनकारक आहे. तसेच प्रकल्पाच्या सूचनांनुसार ट्रॅक्टरसह किमान पाच अवजारे खरेदी करणे अनिर्वाय आहे. मात्र काही ठिकाणी फक्त ट्रॅक्टर खरेदी केले तर अवजार खरेदी नाही. तरीही अनुदान दिले असल्याची माहिती पुढे येत आहे. तर एका गटाला फक्त प्लॅन्टर या एकाच घटकासाठी पूर्वसंमती आणि अनुदान देण्यात आले असल्याची बाब उघड होत आहे.अवजारे बँक प्रकल्पासाठी शेडचे बांधकाम करणे गरजेचे आहे. मात्र काही ठिकाणी शेडचे बांधकाम दाखवण्यात आले आहे परंतु अवजारे बँक प्रकल्पच अस्तित्वात नसल्याची धक्कादायक माहिती मिळत आहे. शिवाय योजनेतून घेतलेल्या ट्रॅक्टरवर, अवजारांवर व योजनेतून बांधण्यात आलेल्या शेडजवळ प्रकल्पाचे नाव, लाभार्थी गटाचे नाव, लाभ घेतलेले वर्ष आदी बाबी एम्बोसिंग करणे बंधन कारक आहे. परंतु यातील एकही बाब बऱ्याच ठिकाणी आढळून येत नाहीत.तर महत्वाचा मुद्दा म्हणजे एकाच कुटुंबात अनेक लाभ दिले असल्याच्या तक्रारी लक्षानीय आहेत. या सर्व अफरातफरीत संबंधित कृषी सहायकांचे हितसंबंध गुंतले असल्याची चर्चा आता जोर धरत असून, वरिष्ठ स्तरावरून सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी सर्व सामान्य जनता करीत आहे.





विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकरी नेहमीच जागतिक हवामान बदलाच्या समस्येमुळे आर्थिक अडचणीत असतात. हीच गंभीर बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र शासन आणि जागतिक बँक यांच्या अर्थसाह्याने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प म्हणजेच ' पोकरा ' योजनेची आखणी करण्यात आली आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील १५ जिल्ह्यांचा सदर योजनेत समावेश करण्यात आला होता. त्यात आकांक्षित असलेल्या वाशिम जिल्ह्याला आवर्जून समाविष्ट करण्यात आले होते. पोकरा प्रकल्पात संपूर्ण गावाचा कायापालट करण्याची क्षमता असल्याने जिल्ह्यातील समाविष्ट गावे समृद्ध होतील अशी अपेक्षा होती.मात्र प्रभावी अंमलबजावणीच्या अभावी वाशिम जिल्ह्यात अगदी सुरुवातीपासूनच ' पोकराला ' पोखरण्याचे काम सुरु झाले ते योजनेचा पहिला टप्पा संपेपर्यंत कायम राहिले असल्याचा संशय आता व्यक्त केल्या जात आहे. नैसर्गिक वातावरणाच्या बदलामुळे सातत्याने पडणाऱ्या दुष्काळाच्या झळा शेतकऱ्यांनाच सर्वाधिक प्रमाणात सोसाव्या लागतात.हे वास्तव लक्षात घेऊन शासनाने विदर्भ- मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त १५ जिल्ह्यांचा ' पोकरा ' योजनेच्या पहिल्या टप्प्यात समावेश केला होता. परंतु,ढिसाळ कारभारआणि त्यातील अनियमितेमुळे प्रकल्पाला अपेक्षित गती तर मिळालीच नाही.मात्र विदर्भातील अकोला, बुलढाणा आणि मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील करोडो रुपयांचा भ्रष्टाचार उघड झाला आहे. तीच गत वाशिम जिल्ह्यात सुद्धा झाली असल्याची चर्चा आता जोर धरत आहे. रिसोड तालुक्यात भ्रष्टाचाराचे प्रमाण जास्त असल्याचे बोलले जात असून, अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या आशीर्वादाने ' अर्धे पैसे द्या, डबल अनुदान घ्या! हे सूत्र मोठ्या प्रमाणात वापरले गेले असल्याचे सर्व सामान्य नागरिक बोलत आहेत.रिसोड तालुक्यात सदर योजनेचे नियम धाब्यावर बसवून नियमबाह्य अनुदानची खैरात वाटण्यात आली असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. तर काही गावात गटाच्या नावाखाली संबंधित कर्मचाऱ्यांनी ' अर्थपूर्ण ' संबंधातून काही मोजक्या लोकांना वैक्तिक लाभ मिळवून दिला असल्याची माहिती समोर येत आहे.त्यामुळे काही तुपाशी, तर अनेक उपाशी असे चित्र आता दिवसागणिक पाहावयास मिळत आहे. लवकरच या योजनेत झालेला आर्थिक अपहार व योजनेचे निकष आणि नियम वेशीला टांगून मार्जितल्या लोकांना वितरित केलेले अनुदान याची संपूर्ण यादीच उजगार होणार आहे. अशी माहिती विश्वानीय सूत्रांकडून मिळाली आहे. त्यामुळे वाशिम जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या पोकराच्या पहिल्या टप्प्याची चौकशी होणार हे निश्चित मानले जात आहे.परिणामी ' पोकराला ' पोखरणारे कोण? याची चौकशी झालीच पाहिजे! अशी आग्रही मागणी योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेले लाभार्थी करत आहेत.



सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम Express

सरकारी जागेतील अतिक्रमित विहिर खाजगी सात- बारावरून हटावा

खाजगी व सरकारी जमिनीतील घुसखोरी थांबवा !

'पोकरा' योजनेत घोटाळा, फसवेगिरीतून पैसा केला गोळा

*अनुदान लाटण्यासाठी 'बोगस' बिले सादर *रिसोड तालुक्यात काम अपूर्ण, अनुदान घेतले पूर्ण *पोकरातील सावळागोंधळ चव्हाट्यावर

कृषी सहायकाची मर्जी, अनुदान वाटप फर्जी !

अधिकारी मेहरबान, कर्मचारी पहेलवान

कृषी अधिकाऱ्यांची भ्रष्ट निती, कामाची कागदावरच गती...

कुंपनानेच खाल्ली शेती, योजनेची माती

पोखराला पोखरले, भ्रष्टाचाराने घेरले...

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरूवार दि.२५ डिसेंबर २०२५

पोखरा योजनेत फसवेगिरी, गावठाण हद्दीत घुसखोरी !

*तक्रार दाखल, प्रशासनाने घेतली दाखल * चौकशी समिती करणार तपास

पोकरातील भ्रष्टाचातील धडकी, पत्रकाराच्या परिवारास... जीवे मारण्याची धमकी !

*रिसोड पोलीसात तक्रार दाखल, कारवाई करण्याची मागणी *पोकरातील भ्रष्टाचाराची तालुक्यात खळबळ

भ्रष्टअधिकाऱ्यांची लाभार्थ्यांना सुट, स्व-दानासाठी अनुदानाची लुट !

ज्याचा वशिला, त्यांचं कुत्र काशीला..

*पोकराला पोखरले, भ्रष्टाचाराने घेरले * चौकशी व तक्रारीतून धरले ...

एकाच कुटूंबात दिलेल्या लाखों रुपयांच्या अनुदानाचा गोषवारा.

सोमवार दि.२९ डिसेंबर २०२५

अधिकाऱ्यांची भ्रष्टनीती, कुंपनानेच खाली शेती...

पोकरा योजनेची माती !

* पोखरा योजनेमधील भ्रष्टाचाराची कसून चौकशी गरज * साहित्य खरेदीतील अनेक गैरप्रकार येणार चव्हाट्यावर

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सोमवार दि.५ जानेवारी २०२६

अर्थपूर्ण संबंधातून वाढली मुजोरी, गावठाण हद्दीत घुसखोरी !

*'त्या' अतिक्रमित विहीरीचा चौकशी अहवाल मागितला

गुरुवार दि.७ जानेवारी २०२६

फळबाग लागवड न करता अनुदान हडपले, भ्रष्टाचाराविरोधात वातावरण तापले !

नियमांचा केला अनादर, अनुदान लाटण्यासाठी बोगस बिले केली सादर..

## थोडक्यात

### व्यक्तिमत्व विकासाचे साधन म्हणजे बी.एड.शिक्षण

-माजी राज्यमंत्री सुभाषराव ठाकरे



• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

स्थानिक यशवंतराव चव्हाण शिक्षण महाविद्यालय मंगरूळपीर च्या बी. एड. च्या विद्यार्थ्यांचा छात्रसेवा काल श्री मोतीरामजी चंद्रभानजी ठाकरे माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय कासोळा येथे दिनांक २४ डिसेंबर २०२५ ते ३ जानेवारी २०२६ पर्यंत उत्साहात संपन्न झाले.

वार्षिक आंतरवासिता शिबिराचा समारोप हा सांस्कृतिक कार्यक्रमाने विद्यालयाच्या प्रांगणात पार पडला या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी राज्यमंत्री सुभाषराव ठाकरे व उद्घाटक म्हणून चंद्रकांत ठाकरे व प्रमुख अतिथी म्हणून राम ठाकरे , ठाणेदार भाकडे, दिलीप ठाकरे, कैलास येवले, बबन ठाकरे,बाबाराव चौधरी ,ग्राम कासोळ्याच्या प्रथम नागरिक कांताताई लोंढे, श्रीकांत ठाकरे, स्वप्नील चौधरी, संजय लोंढे विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रशांत ठाकरे, तसेच शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य ओमप्रकाश झीमटे हे होते.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवर मंडळीच्या मार्गदर्शनाने झाली या कार्यक्रमात बी.एड. प्रशिक्षनार्थ्यानी शाळेतील इयता ५ ते ९ च्या विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक व प्रभोधनात्मक कार्यक्रम बसविले होते. त्यात एकल अभिनय, समूह गीत , समूह नृत्य , भारुड , विद्यार्थ्यांनी सादर केले. तर अध्यक्ष साहेबांनी आपल्या भाषणात महाविद्यालय हे फक्त पदवी देत नसून त्याच्या जीवनात प्रत्यक्ष अनुभव देऊन जीवन जगण्यासाठी समृद्ध करते असे गौरव उदगार काढले.तर या कार्याक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली शाहाकार ,धीरज आडे , वैष्णवी कांबे, विष्णू घुमसे यांनी व प्रास्ताविक डॉ. विठ्ठल होनाळे व आभार कु. अदिती राउत व जया दहातोंडे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्रा.गवई ,प्रा .निलटकर,प्रा.डेरे ,प्रा.सावळे,भागवत टोपले,रामेश्वर ढवळे विद्यार्थी प्रतिनिधी कु.एकता खाडे व जयपाल राठोड व सर्व बी.एड. छात्राध्यापकानी परिश्रम घेतले.

### खरीप पिकांची अंतिम पैसे-वारी सरासरी ४७ पैसे

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

सन २०२५-२६ च्या खरीप हंगामातील प्रमुख पिकांची जिल्ह्याची सरासरी हंगामी पैसेवारी ४७ पैसे इतकी जाहीर करण्यात आली आहे.जिल्ह्यात एकूण ७९३ महसूल गावे आहेत.यातील सर्वच ७९३ गावांची खरीप हंगामाची नजर अंदाज पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आहे.

## अधिकाऱ्याचा पैशालाच मान, कर्तव्याचे नाही भान,

# न्यायालयाचा केला अवमान !

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

रिसोड तालुक्यातील जवळा येथील रमेश चाटे यांच्या वडीलोपार्जित जमिनीच्या बनावट फेरफार प्रकरणात रिसोडच्या महसूल अधिकाऱ्यांनी पैशाच्या हव्यासापोटी मा.न्यायालयाच्या आदेशाचा अवमान केल्याची गंभीर बाब उघडकीस आली आहे. चाटे यांनी थेट राज्याच्या महसूलमंत्र्यांकडे पुराव्यासह तक्रार केली असून 'या' तक्रारीने रिसोड तहसिलमधील कार्यरत असेलेल्या अनेक दुःशासन,दुर्योधनांची धोबीपछाड होण्याची चर्चा आहे.

*जवळा येथील बनावट फेरफार प्रकरण

*पैशासाठी अधिकाऱ्यांची धृतराष्ट्राची भूमिका

* तहसिलमध्ये अनेक दुःशासन, दुर्योधन कार्यरत

*रमेश चाटे यांची महसूल मंत्र्यांकडे तक्रार



रिसोड तालुक्यातील जवळा येथील गट क्रमांक ५ / १ ही जमिन चाटे कुटुंबाची वडीलोपार्जित जमिन आहे.सद्या या जमिनीचे क्षेत्रफळ ९ हेक्टर ८३ आर आणि पोटखराब ०.३ आर अशी ९.८६ आर एवढे आहे. त्यापैकी शिल्लक असलेली १.१६ हेक्टर जमिन चाटे यांच्या मालकी हक्काची जमिन आहे. चाटे यांच्या कुटुंबातील वडील,काकांनी त्यांच्या एकूण जमिनीपैकी काही जमिन जाधव यांना टप्पा,टप्पाने विक्री केली होती.आणि चाटे यांची शिल्लक राहिलेली जमिन जाधव बटाईने,ठोक्याने वहिती करत होते. चाटे यांच्या १.१६ आर जमिनीवर जाधव यांनी जबरदस्तीने ताबा केल्याप्रकरणी चाटे यांनी रिसोड येथील मा.दिवाणी न्यायालयामध्ये प्रकरण दाखल केले होते.त्याच दरम्यान,जाधव यांनी चाटे यांची १.१६ आर जमिन त्यांची व कुळाची असल्याबाबत रिसोडच्या तहसिलदारांकडे प्रकरण दाखल केले होते. तहसिलदारांकडे हे प्रकरण सुरू असताना चाटे यांनी मा.न्यायालयामध्ये या जमिनीचे प्रकरण सुरू असल्याबाबतची कागदपत्रे या प्रकरणात दाखल केली होती. संबंधित जबाबदार महसूल अधिकाऱ्यांना सदर प्रकरण न्यायालयात न्यायप्रवीष्ठ असल्याचे माहित होते.त्याच दरम्यान २९/ ०४/२०२५ रोजी मा.दिवाणी न्यायालयातील प्रकरणाचा निकाल रमेश चाटे यांच्या बाजुने लागला. या निकालात मा.न्यायालयाने गैरअर्जदार तुकाराम जाधव व त्यांच्या नातेवाईकांनी चाटे यांची १.१६ आर जमिनीचा ताबा तिन महिन्यात द्यावा असा आदेश दिला होता. मा.न्यायालयामध्ये या शेताच्या मालकी हक्काबाबत व त्यांचे कुळ असल्याबाबतचे कोणतेही कागदपत्रे,पुरावे सादर करू शकले नाहीत.म्हणून रिसोड तहसिल मधील मलिदा

लाटणाऱ्या गँग सोबत संगनमत करून दि.२६/०६/२०२५ रोजी आदेश क्रमांक रा.मा. - हा बनावट आदेश काढला. आणि चाटे यांच्या १.१६ आर जमिनीचा फेरफार 'या' आदेशाचा आणि १९६९ मध्ये चाटे यांचेकडून तिन एकर जमिन खरेदी केलेले दस्त क्र.२९९/१९६९ च्या आधारे दिनांक ०७/०७/२०२५ रोजी फेरफार क्र.१२९९ नुसार रमेश चाटे व त्यांच्या कुटुंबियांची मालकी हक्काची वडीलोपार्जित १.१६ आर जमिन जाधवा यांच्या नावाने करून दिल्याचा महाघोटाळा केला आहे.रिसोड तहसिलमधील भ्रष्ट आणि पैशासाठी धृतराष्ट्राची भूमाका घेणाऱ्या लालची



सोमवार दि ५ जानेवारी २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम Express

रिसोड तहसील कार्यालयात भ्रष्टाचार, अधिकारी पैशासाठी लाचार !

*जवळा येथील रमेश चाटे यांच्या वडीलोपार्जित शेतीचा परस्पर फेरफार

* तलाठी, मंडळ अधिकारी आणि नायब तहसिलदाराचे संगनमत


कोण हलविते सुत्र, हेराफेरीसाठी सर्व एकत्र


बोगस आदेश पत्र, भ्रष्टाचाराचे सत्र !


अधिकाऱ्यांना जवळा येथील गट क्र.५/१ मधील रमेश चाटे यांच्या १.१६ आर जमिनीच्या मालकी हक्काचे प्रकरण मा.न्यायालयामध्ये न्यायप्रवीष्ठ असल्याचे माहित होते. तरीसुद्धा दिनांक २६/०६/ २०२५ रोजी कथित भ्रष्ट अधिकाऱ्यांनी बनावट आदेश काढून मा.न्यायालयाच्या दि.२९/०४/ २०२५ च्या आदेशाचा अवमान केला आहे. ही गंभीर बाब रमेश चाटे यांनी महसूल मंत्र्यांकडे पाठवलेल्या तक्रारीमध्ये निदर्शनास आणून दिलेली आहे.आता या प्रकरणाची सखोल चौकशी होणार असून भ्रष्टांची धोबीपछाड होणारच आहे.तसेच 'या' प्रकरणासोबतच असे अनेक बनावट आदेश सुद्धा उघडकीस येवून रिसोड तालुक्यातील जमिन हडपण्याचा घोटाळा सुद्धा उघडकीस येणार असल्याची तहसिल परिसरात चर्चा आहे.


## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान...

# सीईओ यांची मोरगव्हान येथे भेट, विकास कामांची पाहणी थेट!









• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •


केवळ तपासणीपुरते किंवा पुरस्कार मिळवायचा म्हणून गाव चांगले करू नका तर कायमस्वरूपी आपले गाव स्वच्छ, सुंदर, हरित आणि आदर्श ठेवा असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी रिसोड तालुक्यातील मोरगव्हाण येथे केले. मुख्यमंत्री पंचायतराज अभियान अंतर्गत ५ जानेवारी रोजी मोरगव्हाण या ग्रामपंचायतला त्यांनी भेट दिली आणि विविध विकास कामांची पाहणी केली तसेच ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी धैर्यशील पाटील, रिसोड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गजानन खुळे, ग्रामपंचायत सरपंच, गट शिक्षणाधिकारी बद्रीनारायण कोकाटे, विस्तार अधिकारी उमाळे, शाखा अभियंता इंगोले आदिंची उपस्थिती होती. पुढे बोलतांना सीईओ चौहान म्हणाले की यापूर्वी जिल्ह्यातील खूप गावे स्वच्छता अभियानामध्ये आणि स्मार्ट ग्राम योजनेमध्ये आघाडीवर होते परंतु त्यानंतर ते याच कामात मागे पडले. त्यांच्या गावातील स्वच्छता किंवा इतर नाविन्यपूर्ण उपक्रम हे शाश्वत राहिले नाहीत. मोरगव्हाण मध्ये असे होऊ नये, गाव कायमस्वरूपी आदर्श ठेवा असे ते म्हणाले.भेटी दरम्यान सीईओ यांनी गावातील शाळा, अंगणवाडी, परसबाग, फळबाग, कचरा व्यवस्थापनासाठी बांधण्यात आलेले शेग्रीगेशन शेड इत्यादी कामांची पाहणी केली. भेटीदरम्यान गावात पुरेशी स्वच्छता व रंगरंगोटी करण्यात आली होती. गावातील लोकसहभाग पाहून सीईओ अर्पित चौहान यांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाला ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य, तंटामुक्ती समिती अध्यक्ष, माजी पोलीस पाटील, ग्रामपंचायत पदाधिकारी, जि. प. शाळा मुख्यध्यापक, प्राध्यापक चोपडे आणि ग्रामपंचायत अधिकारी यांची उपस्थिती होती.

## पतंगाच्या दोरीवर माणुसकी अडकू देऊ नका !

### नायलॉन मांजाविरोधात एनसीसी विद्यार्थ्यांचा भावनिक संदेश

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

आनंद, उत्साह आणि परंपरेचा उत्सव असलेला पतंगोत्सव जर नायलॉन मांजामुळे रक्तरंजित होत असेल, तर तो आनंद शोकात बदलण्यास वेळ लागत नाही. नायलॉन मांजा हा कायद्याने गुन्हा असून तो केवळ मानवी जीवनालाच नव्हे तर पर्यावरणाचे संतुलन राखणाऱ्या मुक्या पशुपक्ष्यांच्या जिवालाही गंभीर धोका निर्माण करतो. दुचाकीवरून जाताना मांजामुळे तरुणांची मान कापली जाणे, श्वासोच्छवासाची नस कापली जाऊन गंभीर रक्तस्राव होणे अशा अंगावर शहारे आणणाऱ्या घटना सातत्याने समोर येत आहेत. तलवारीसारखा धारदार असलेला हा मांजा क्षणात आयुष्य उद्ध्वस्त करू शकतो, ही बाब लक्षात घेऊन पतंग उडवितांना नायलॉन व चायनीज मांजाचा वापर करू नका, असे कळकळीचे आणि भावनिक आवाहन एनसीसी विद्यार्थ्यांनी केले आहे.



६ जानेवारी रोजी स्थानिक श्री बाकलीवाल विद्यालयात एनसीसीच्या वतीने पतंगोत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. एकूण ६८ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. या सामाजिक जाणीव जागवणाऱ्या उपक्रमाबद्दल बाकलीवाल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अॅड. सुरेंद्रकुमार बाकलीवाल, शाळेचे मुख्याध्यापक बबनराव बिल्लारी, उपमुख्याध्यापक दंभीवाल तसेच एनसीसी अधिकारी अमोल काळे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक कौतुक केले. आनंदाच्या पतंगोत्सवात माणुसकी, संवेदनशीलता आणि जबाबदारी जपली गेली तरच हा सण खऱ्या अर्थाने उत्सव ठरेल, असा भावनिक संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
गुरुवार, दि. ८ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# 15 तारखेला फक्त मतदान नाही तर अकोल्याच्या भविष्याचा फैसला करायचा : एकनाथ शिंदे

◆परिवर्तन घडवण्यासाठी धनुष्य बाणाचे बटन दाबा आणि विरोधकांचे डिपॉझिट जप्त करण्याचे आवाहन

प्रतिनिधी ८ जानेवारी





**अकोला :** येत्या १५ तारखेला अकोला महापालिकेवर भगवा फडकवा. धनुष्य बाण महाराष्ट्राचा स्वाभिमान आहे. बाळासाहेब आणि दिघे साहेबांची आन बान शान आहे. लाडक्या बहिणी भाऊ ज्या उमेदवारांच्या मागे आहेत त्यांचा नंबर पहिला असेल असा विश्वास शिवसेना शिंदे पक्षाचे प्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी दुपारी जुन्या शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानात झालेल्या विशाल सभेत बोलताना व्यक्त केला.

राजराजेश्वराला वंदन करून एकनाथ शिंदे यांनी उपस्थिती पाहून सभेला जनसागर उसळला आहे असे सांगितले. जे लोक तुम्हांला पाणी वेळेवर देऊ शकत नाही त्यांना या निवडणुकीत पाणी पाजून महापालिकेवर भगवा फडकवा असे आवाहन केले. भुयारी गटार योजनेसाठी पैसे दिले आहे. सुपर स्पेशालिटी मध्ये पदभरती केल्याशिवाय राहणार नाही. तसेच हद्दवाढ भागातील सोयी सुविधा साठी नगरविकास विभागातून पैसा देऊ असे आश्वासन दिले. उबाठावर टीका करताना शिंदे म्हणाले, जे बाळासाहेबांचे वारसदार समजतात त्यांचा जीव सोन्याची अंडी देणा-या मुंबई मध्ये अडकला आहे. बाहेरचे त्यांना दिसत नाही पण आम्ही बाबासाहेबांचा विचार घराघरात नेला. हे पाहून बाळासाहेब देखील सुखावले असते असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. शिवसेनेच्या वचननाम्याचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मंत्री संजय राठोड, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया, विप्लव बाजोरिया, श्रीकांत देशपांडे, नारायण गव्हाणकर, जिल्हा प्रमुख श्रीरंग पिंजरकर, उपजिल्हा प्रमुख योगेश अग्रवाल यांच्या सह शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महानगरपालिका निवडणूकीत प्रभाग 13 मध्ये भाजपच्या सुनीता अग्रवाल यांच्यासह पूर्ण पॅनलला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी ८ जानेवारी





**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या निवडणुकीचे बिगुल वाजताच राजकीय वातावरण तापू लागले आहे. प्रभाग क्रमांक १३ मध्ये सध्या भारतीय जनता पार्टीच्या अधिकृत उमेदवारांचा प्रचंड बोलबाला पाहायला मिळत असून, त्यांच्या प्रचार सभांना मिळणारा नागरिकांचा प्रतिसाद विरोधकांच्या गोटात धडकी भरवणारा ठरत आहे. या प्रभागातून सुनिता विजय अग्रवाल यांच्यासह विशाल श्रावण इंगळे, प्राची निलेश काकड आणि अनिल सुनीलराव मुरुमकार हे भाजपचे अधिकृत उमेदवार म्हणून रिंगणात असून या 'चौकडी'ने प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. लोकप्रतिनिधी असताना केलेल्या विकासकामामुळे सुनिता अग्रवाल यांची जनसामान्यांत चांगली प्रतिमा असून, त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत घरोघरी विकासाचा अजेंडा पोहोचवला आहे. सुनिता विजय अग्रवाल यांचा प्रभागात दांडगा जनसंपर्क असून, त्यांच्यासोबतच तरुण आणि तडफदार उमेदवार विशाल श्रावण इंगळे, अभ्यासू व्यक्तिमत्त्व प्राची निलेश काकड आणि जनसामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेले अनिल सुनीलराव मुरुमकार यांना महिला, तरुण आणि ज्येष्ठ नागरिक अशा सर्वच स्तरातून पाठिंबा मिळत आहे.

प्रभागात दररोज ठिकठिकाणी होत असलेल्या प्रचार सभांमध्ये नागरिकांनी मोठी गर्दी केली असून विशेषतः महिलांची उपस्थिती लक्षणीय आहे. उमेदवारांचे साधे व्यक्तिमत्त्व आणि कामाप्रती असलेली जिद्द यामुळे प्रभागातील जनता त्यांच्याकडे एक सक्षम लोकप्रतिनिधी म्हणून पाहत आहे. 'आम्हाला हक्काची माणसे मिळाली आहेत, त्यांच्या कामाची पद्धत आणि सर्वसामान्यांशी असलेली नाळ आम्हाला त्यांच्याशी जोडून ठेवणारी आहे,' अशी भावना प्रभागातील नागरिक व्यक्त करीत आहेत. स्वच्छ आणि सुंदर प्रभाग निर्माण करण्यावर या उमेदवारांचा भर असून कचरा व्यवस्थापन, पाणी समस्या कायमस्वरूपी सोडवणे, महिलांची सुरक्षितता आणि सरकारी शाळा-दवाखान्यांच्या सक्षमीकरणाचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे. मिळणारा हा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, प्रभाग क्रमांक १३ मध्ये सुनिता विजय अग्रवाल, विशाल इंगळे, प्राची काकड आणि अनिल मुरुमकार यांचे पारडे सध्या जड असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. 'कमळ' या चिन्हासमोरील बटन दाबून भाजपच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले जात आहे.

# शेगोकार, जोशी, काळे आणि जगताप यांनी पिंजून काढला न्यू तापडिया नगर परिसर

प्रतिनिधी ८ जानेवारी



**अकोला :** अकोला पूर्व मतदारसंघात भारतीय जनता पक्षाला पोषक असा न्यू तापडिया नगर परिसर. प्रभाग ३ मधील भारतीय जनता पक्षाचे उमेदवार सागर शेगोकार, प्रशांत जोशी, नीतू जगताप आणि शशिकला काळे यांनी हा परिसर पिंजून काढला. ठिकठिकाणी उमेदवारांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

हा भाग हद्दवाढ भागाशी जोडलेला आहे. तसेच या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार रणधीर सावरकर यांच्या माध्यमातून १०० कोटी रुपये निधी मिळाला होता. त्यातून पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहे. पाणी, रस्ते, नाल्या, पथदिवे आदीकडे भारतीय जनता पक्षाच्या कार्यकाळात लक्ष दिले. त्यातून विकास साधला जातो आहे.

या भागाच्या विकासात भर पडणार आहे इतकेच नाही कायापालट होणार आहे. तो उड्डाणपुलामुळे. माजी खासदार संजय धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे यांनी उड्डाणपुलाच्या समस्या केंद्रीय तसेच राज्य पातळीवर लावून धरल्या. आता पुलाचे काम अंतिम टप्प्यात आहे. माजी नगरसेविका गीतांजली शेगोकार, सागर शेगोकार, हरीश काळे, बबलू जगताप यांनी देखील त्यांच्या कार्यकाळात जनतेला न्याय देण्यासाठी सतत प्रयत्न केला. त्याचा फायदा या निवडणुकीत निश्चित होईल असा विश्वास व्यक्त केला जातो आहे. न्यू तापडिया नगर तसेच प्रभाग क्रमांक ३ मधील राहिलेले प्रश्न सोडवून नागरिकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटीबद्ध आहोत अशी ग्वाही सागर शेगोकार, प्रशांत जोशी, नीतू जगताप, शशिकला काळे यांनी दिली.

# 16 जानेवारीला अटलजी, भाऊसाहेब फुंडकर, लालाजी शर्मांना विजयरूपी आदरांजली द्यायची आहे : खासदार धोत्रे

प्रतिनिधी ८ जानेवारी



**अकोला :** भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी, भाऊसाहेब फुंडकर, कै. गोवर्धन शर्मा यांना १६ रोजी विजयोत्सव साजरा करून दिवंगत नेत्यांना आदरांजली अर्पण करायची आहे असे प्रतिपादन खासदार अनुप धोत्रे यांनी केले. भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, किशोर पाटील, आमदार वसंत खंडेलवाल, विजय अग्रवाल, जयंत मसने, संतोष शिवरकर, कृष्णा शर्मा, वसंत बाछुका, एड. आशिष काकड, पवन पाडिया, संजय गोटफोडे, एड. सुभाष सिंग ठाकूर, डॉ. अभय जैन, डॉ. किशोर मालोकार, विविध मंडळ अध्यक्ष माजी नगरसेवक, पदाधिकारी महापालिका निवडणुकीत योगदान देत आहे.

भाजप कार्यालयात झालेल्या बैठकीत विजय अग्रवाल यांनी प्रास्ताविक केले. 'मागच्या ११ वर्षांत देवेंद्र फडणवीस यांनी अकोला नाही तर संपूर्ण महाराष्ट्राला 'सुशासन' नेमकं काय असतं हे दाखवून दिलं आहे. अकोला शहरातील हद्दवाढ, विविध रस्ते तसेच अमृत योजना भूमिगत गटार योजना अकोला शहरातील सांस्कृतिक भवन हॉस्पिटल्स, वेगवेगळ्या सुविधा पोलीस वसाहत, ग्रामदेवत राजेश्वर मंदिरालाला ब वर्गाचा दर्जा तहसील कार्यालय सर्व कामे कोणी केली हे माहित आहे. देवेंद्र फडणवीस आणि भाजपाने मागील ११ वर्षांत ज्या प्रमाणे काम केलं त्याने अकोलेकरांना प्रभावीत झालेले आहेत. त्यामुळे आगामी काळात अकोला महापालिकेवर भगवा झेंडा फडकताना दिसेल.' आमदार रणधीर सावरकर यांनी, 'देशामध्ये पंतप्रधान म्हणून अटलजींनी केलेलं कार्य हे अविस्मरणीय आहे. ते नेहमी म्हणायाचे 'रस्ते हे देशाला एकात्मतेकडे नेतात' आणि त्यांच्याच संकल्पनेतून देशाला वर्ल्डक्लास हायवे पाहायला मिळाले. त्यांनी पहिल्यांदा प्रधानमंत्री ग्रामसडक योजना देशात सुरु केली. ज्यामुळे शहरे गावांशी जोडली गेली. विकासाचा धागा पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे नेत आहेत. किशोर पाटील यांनी विचार व्यक्त केले.

# भाजपा अकोला महानगर तर्फे गुरुव्दारासिंग सभा येथे वीर बाल दिनानिमित्त कार्यक्रम

प्रतिनिधी ८ जानेवारी

**अकोला :** भारतीय जनता पक्षाच प्रदेश सरचिटणीस तथा आमदार रणधीरभाऊ सावरकर, खासदार अनुपभाऊ धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल, महानगराध्यक्ष जयंतराव मसने, विजयभाऊ अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपा महानगर तर्फे श्री गुरू गोबिंदसिंहजी यांचे छोटे साहिबजादे बाबा जोरावर सिंहजी आणि बाबा फतेह सिंहजी यांचे स्मरण करून वीर बाल दिवस निमित्त गुरुव्दारासिंग सभा येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गुरुव्दारासिंग सभा, रेल्वे स्टेशन रोड अकोला तर्फे मान्यवरांचे स्वागत केले. जसमितसिंग ओबेरॉय संयोजक सेल भाजपा अकोला महानगर व सहकारी उपस्थित होते. सुरुवातीला साहिब जादे यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.

# दि अकोला अर्बन बँकेच्या इंटरनेट बँकिंगचा दिमाखदार शुभारंभ

प्रतिनिधी ८ जानेवारी



**श्री राज राजेश्वर मंदिराच्या प्रतिकृतीचे लोकार्पण**

◆दि अकोला अर्बन बँकेच्या वतीने थ्री डी प्रिंटिंगच्या माध्यमातून श्री राज राजेश्वर मंदिराच्या हुबेहूब प्रतिकृतीचे लोकार्पण भक्तिभावात पार पडले. अकोल्याचे आराध्य दैवत असलेल्या या प्राचीन व श्रद्धास्थानाच्या प्रतिकृतीमुळे भाविकांना मंदिराच्या दिव्यतेचा अनुभव अधिक जवळून घेता येणार आहे. प्रथम प्रतिकृती श्री राज राजेश्वर संस्थानचे अध्यक्ष ॲड. गिरीश देशपांडे, सचिव गजानन घोंगे यांना प्रदान करण्यात आली.

**अकोला :** अकोला अर्बन बँकेच्या इंटरनेट बँकिंग सेवेचा शुभारंभ महेश भवनात उत्साहात झाला. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी बँकेचे अध्यक्ष शंतनू जोशी होते. उद्घाटक म्हणून उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील, विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अकोलाचे अध्यक्ष निकेश गुप्ता प्रमुख पाहुणे होते. बँकेचे उपाध्यक्ष राहुल राठी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी राजन सोनटक्के हेही उपस्थित होते.

प्रास्ताविकात मुख्य कार्यकारी अधिकारी राजन सोनटक्के यांनी बँकेच्या विविध आर्थिक सेवा, आधुनिक बँकिंग प्रॉडक्ट्स आणि ग्राहकाभिमुख उपक्रमांची माहिती दिली. ग्राहकांना अधिक सुलभ, सुरक्षित व वेगवान सेवा देण्याच्या दृष्टीने इंटरनेट बँकिंग हे महत्त्वाचे पाऊल असल्याचे त्यांनी नमूद केले. सुदर्शन पाटील यांनी इंटरनेट बँकिंगच्या शुभेच्छा देताना डिजिटल व्यवहार करताना घ्यावयाची खबरदारी, डिजिटल अरेस्ट तसेच सायबर क्राईमच्या वाढत्या घटनांवर प्रकाश टाकला. सुरक्षित आणि जागरूक वापरच सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण देऊ शकतो, असे त्यांनी सांगितले. निकेश गुप्ता यांनी अकोला अर्बन बँकेच्या कार्याचे कौतुक करताना, अकोल्यातील अनेक व्यावसायिकांना सुरुवातीच्या काळात कुणीही कर्ज देत नसताना या बँकेने विश्वास दाखवून त्यांना आर्थिक पाठबळ दिले, त्यामुळे अनेक व्यवसाय उभे राहिले, असे सांगितले. कार्यक्रमास बँकेचे संचालक, अधिकारी, कर्मचारी तसेच शहरातील अनेक गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. इंटरनेट बँकिंगच्या शुभारंभामुळे दि अकोला अर्बन बँक ग्राहकसेवेत नव्या डिजिटल पर्वात प्रवेश करत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# भाजपने 60 टक्के नवीन उमेदवारांना दिली संधी : विजय अग्रवाल

प्रतिनिधी ८ जानेवारी



**अकोला :** महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी कॉंग्रेस यांची युती झाली असून भारतीय जनता पार्टी ६२ तर १४ ठिकाणी राष्ट्रवादी कॉंग्रेसने उमेदवार दिले आहे. ४ ठिकाणी भाजपा मित्र पक्षसाठी जागा सोडणार आहे अशी माहिती अकोला भाजपा निवडणूक प्रमुख विजय अग्रवाल यांनी दिली.


भारतीय जनता पक्षाने आज उमेदवारी देताना गुजरात पेटन च्या धरती वर ६० टक्के नवीन उमेदवारांना संधी दिली असून नवीन आणि जुने कार्यकर्त्यांना सर्वेच्या आधारावर पक्षाने तिकीट दिली आहे या मध्ये ४० टक्के २०१७ मध्ये निवडून आलेल्या नगरसेवका पैकी नवीन कार्यकर्त्यांना संधी दिली आहे. २८ महिलांना, ३४ पुरुष, ११ अनुसूचित जाती, १ अनु. जमाती, १८ ओबीसी तसेच ३२ सर्वसाधारण तसेच सर्व वर्गाला न्याय देण्याचा पर्यंत करण्यात आला आहे. ज्यांना तिकीट दिली नाही त्यांच्या उपयोग संघटना विस्तारासाठी व त्यांच्या योग्य तो सम्मान करण्यात येणार आहे. भाजपा प्रदेश निवड समितीने दिलेल्या उमेद्वारायाना संधी देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण, निवडणूक प्रभारी ना. चंद्रशेखर बावनकुळे, संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, भाजपा प्रदेश सरचिटणीस आ. रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, पालकमंत्री नाआकाशफुडकरआमदार वसंत खंडेलवाल, भाजपा महानगर अध्यक्ष जयंत मसने, निवडणूक प्रमुख विजय अग्रवाल यांची मान्यता घेऊन भाजपा प्रसिद्धी प्रमुख गिरीश जोशी यांनी उमेदवारांच्या नावांची माहिती दिली.

प्रभाग - १ ( ब ) सर्वसाधारण महिला दिपाली राम बोंद्रे, प्रभाग - २ ( ब ) ना.मा.प्र. शरद श्रीराम तुरकर २ ( क ) सर्वसाधारण महिला अनिता राजेश चौधरी, २ ( ड ) सर्वसाधारण नितीन राऊत, प्रभाग - ३ ( अ ) अनु. जाती महिला शशिकला काळे, ३ ( ब ) ना.मा.प्र. महिला नितू जगताप, ३ ( क ) सर्वसाधारण सागर शेगोकार, ३ ( ड ) प्रशांत जोशी, ४ ( अ ) अनु. जाती संदीप शेगोकार, ४ ( ब ) शिल्पा वरोकार, ४ ( क ) पल्लवी मोरे, ४ ( ड ) मिलिंद राऊत, ५ ( अ विद्या खंडारे, ५ ( ब ) जयंत मसने, ५ ( क ) रश्मी अवचार, ५ ( ड ) विजय अग्रवाल, ६ ( अ ) आरती घोगलीया, ६ ( ब ) हर्षद भांबरे, ६ ( क ) निकिता देशमुख, ६ ( ड ) पवन महल्ले. ८ ( अ ) रंजना विंचनकर, ८ ( ब ) तुषार भिरड, ८ ( क ) माधुरी क्षीरसागर, ८ ( ड ) राजेश्वर घोटे, ९ ( ब ) ज्योती मानकर, ९ ( ड ) हर्षल चौधरी, १० ( अ ) मंजुषा शेळके, १० ( ब ) वैशाली शेळके, १० ( क ) अनिल गरड, १० ( ड ) नितीन ताकवाले, ११ ( ड ) राहुल चौरसिया, १२ ( अ ) संतोष डोंगरे, १२ ( ब ) कल्पना गोटफोडे, १२ ( ड ) अजय शर्मा, १३ ( अ ) विशाल इंगळे, १३ ( ब ) प्राची काकड, १३ ( क ) सुनीता अग्रवाल, १३ ( ड ) अनिल मुरूमकार, १४ ( अ ) दिपाली जगताप, १४ ( ब ) अस्मिता वगारे, १४ ( क ) गोपाल मुळे, १४ ( ड ) दिलीप भरणे, १५ ( अ ) हरीश अलीमचंदानी, १५ ( ब ) मनीषा भंसाली, १५ ( क ) शारदा खेडकर, १५ ( ड ) अरविंद टाले, १६ ( अ ) सिद्धार्थ उपर्वट, १६ ( ब ) मुस्कान पंजवानी, १६ ( ड ) संजय बडोने, १७ ( ब ) अमोल मोहोकार, १७ ( ड ) करण साहू, १८ ( अ ) सरिता कांबळे, १८ ( ब ) अमोल गोगे, १८ ( ड ) दिलीप मिश्रा, १९ ( अ ) धनंजय धबाले, १९ ( ब ) गजानन सोनोने, १९ ( क ) योगिता पावसाळे, १९ ( ड ) माधुरी बडोने, २० ( अ ) मंगेश झिने ६० प्रभाग - २० ( ब ) शारदा ढोरे, २० ( क ) सोनाली अंधारे, २० ( ड ) सर्वसाधारण विनोद मापारी.

# विकास कामांच्या भरोशावर निवडणूक जिंकणार – आ. रणधीर सावरकर

प्रतिनिधी ८ जानेवारी



**अकोला :** सकारात्मक प्रचाराच्या माध्यमातून कोणावरही टीका टिपणी न करता विकास कामे सोशल मीडियाच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचवावे. केंद्र आणि राज्य सरकार आणि अकोला महानगरपालिकेतील कामे त्रिबल इंजन सरकार याच्या भरोशावर आपण निवडणूक जिंकणार असल्याचे प्रतिपादन भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकरांनी केलेले.

भाजपा कार्यालयात सोशल मीडिया कक्षाचे उद्घाटन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महानगर अध्यक्ष जयंत मसने हे होते तर यावेळी गिरीश जोशी, रिचा शहा, ऋचा शहा, शिवा हिंगणे, यश सिकरीया, जितेंद्र देशमुख, ध्रुव खुणे, माधव मानकर, विवेक भरणे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी सोशल मीडियाचा वापर योग्य ते पद्धतीने करून विरोधकांच्या अपप्रचाराला चूक उत्तर देण्यासाठी भारतीय जनता पक्षाने टीम उभी केली असून त्या टीमच्या माध्यमातून सोशल मीडियाच्या माध्यमातून भारतीय जनता पक्षांनी केलेले काम केंद्र राज्य सरकार आणि महानगरपालिकेच्या कामकाजाचा लेखाजोखा जनतेपर्यंत पोहोचवण्याचं काम करण्यात येईल या दृष्टीने २५ ४५ जणांची टीम करण्यात आली असून आणि त्या टीमचे काम सुरू झाले आहे भारतीय जनता पक्षाला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नवीन वर्षाची भेट देण्याचा निर्धार भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केला असून राज राजेश्वर नगरीतील नागरिक हे भारतीय जनता पक्षावर प्रेम करणारे असून त्या प्रेमाच्या बळावर भारतीय जनता पक्ष यश प्राप्त करेल असा विश्वास जयंत मसने यांनी व्यक्त केला.

# मनुताई कन्या शाळा गाईड पथकाने गिरविले शिस्त सहकार्य स्वावलंबन व देश सेवेचे धडे

प्रतिनिधी ८ जानेवारी

**अकोला :** ' तयार राहा 'असे ब्रीदवाक्य असलेली गाईड चळवळ. या गाईड चळवळी अंतर्गत विद्यार्थ्यांचा शारीरिक, बौद्धिक विकास साधता यावा या उदात्त हेतूने मनू ताई कन्या शाळा येथे गाईड शिबिर संपन्न झाले. गाईड शिबिराची सुरुवात शाळेच्या आदरणीय मुख्याध्यापिका सौ धारस्कर यांच्या हस्ते गाईड ध्वजारोहणाने करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये निष्ठा, विनयशीलता, नेतृत्व गुण, सामाजिक जबाबदारी, स्वावलंबन, निसर्गाशी असलेला संबंध आणि जीवन कौशल्य विकसित व्हावे याकरता शिबिरामध्ये गाईडचे नियम, गाईडची प्रार्थना आणि शिस्तीचे महत्व समजवून क्रीडा, हस्तकला, पाककला यासारख्या क्रिया कलापांद्वारे विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. तसेच तंबू उभारणे, शिबिर परिसर स्वच्छ ठेवणे यांचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. प्रथमोपचार, दोरीच्या गाठी, नकाशाचा वापर यांचे प्रशिक्षण सुद्धा देण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा याकरता शिबिरादरम्यान शेकोटीचा कार्यक्रम घेण्यात आला यामध्ये नृत्य गायनाद्वारे विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

शिबिराच्या शेवटी अन्न हे पूर्णब्रह्म असून ते कसे ग्रहण करावे याबाबतचे धडे देत विद्यार्थी शिक्षण व शिक्षकेतर कर्मचारी यांनी एकत्रितपणे सहभोजनाचा आनंद घेतला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK